अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार, दि. ११ ऑक्टोबर २०२२ | वर्ष : २१ वे ▸ अंक : १४ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# दोन्ही गटात 'बाळासाहेब' अन् 'शिवसेना'; कुरघोडी थांबेना, वाद मिटेना, प्रश्न सुटेना

## ठाकरे गट : शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे
## शिंदे गट : बाळासाहेबांची शिवसेना

सुराज्य/सोलापूर

**एकीकडे विधानपरिषदेची निवडणूक प्रक्रिया चालू होती आणि दुसरीकडे शिवसेनेत बंड चालू झाले होते; तेव्हापासून चालू झालेला तत्कालीन मुख्यमंत्री उध्दव ठाकरे आणि विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातील वाद अद्यापही मिटेना. तेव्हापासून सुरू झालेल्या कुरघोड्याही थांबेनात. त्यामुळेच खरी शिवसेना कोणाची? हा प्रश्न निवडणूक आयोगालाही सुटेना. दोन्ही गट म्हणतात 'बाळासाहेब', 'शिवसेना' आणि 'धनुष्यबाण' आमचाच. शेवटी निवडणूक आयोगाने 'धनुष्यबाण' गोठवला आणि फक्त 'शिवसेना' हे नाव वापरण्यासही मनाई केली. त्यानंतर ठाकरे गटाला ' शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे' आणि शिंदे गटाला 'बाळासाहेबांची शिवसेना' हे नाव मिळाले. त्यामुळे दोन्ही गट 'बाळासाहेब' आणि 'शिवसेना' हे शब्द सोडायला तयार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.**

निवडणूक आयोगाकडून शिंदे गट आणि उद्धव ठाकरे गटाला नवीन नावे बहाल करण्यात आली आहेत. उद्धव ठाकरे गटाला 'शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे' हे नाव देण्यात आले असून, 'धगधगती मशाल' हे चिन्ह मिळाले आहे. शिंदे गटाला 'बाळासाहेबांची शिवसेना' हे नाव मिळाले असून, त्यांचे चिन्ह मात्र ठरले नाही. चिन्हासाठी निवडणूक आयोगाने तीन पर्याय देण्यास सांगितले आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेनेचे धनुष्यबाण हे चिन्ह गोठवण्याचा निर्णय घेत शिवसेना हे नाव वापरण्यावर तात्पुरती बंदी घातली आहे. त्यामुळे दोन्ही गटांना नवे नाव आणि नवे चिन्ह देण्याची प्रक्रिया निवडणूक आयोगाला पार पाडावी लागली. त्यामध्ये आयोगाने दोन्ही गटाला त्यांनी सुचवलेली नावे बहाल केली.

शिवसेना
उध्दव बाळासाहेब ठाकरे

### दोन्ही गटांना दणका

अंधेरी पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाने त्रिशूळ, उगवता सूर्य आणि मशाल या तीन चिन्हांचा पर्याय निवडणूक आयोगाकडे पाठवला होता. शिंदे गटाने त्रिशूळ, गदा आणि उगवता सूर्य ही चिन्हे निवडणूक आयोगाकडे पाठवली होती. मात्र निवडणूक आयोगाने आता 'त्रिशूळ' आणि 'गदा' चिन्ह बाद करत दोन्ही गटाला पुन्हा मोठा धक्का दिला आहे. धार्मिक चिन्ह असल्याचे म्हणत आयोगाने ही दोन्ही चिन्हे नाकारली आहेत.

### त्रिशूळ व गदा धार्मिक प्रतीक

ठाकरे गटाने त्रिशूळ, उगवता सूर्य आणि मशाल ही चिन्हे सुचवली होती. दुसरीकडे शिंदे गटानेही त्रिशूल, उगवता सूर्य आणि गदा ही चिन्हे सुचवली होती. त्रिशूळ आणि गदा ही धार्मिक प्रतीके असल्यामुळे निवडणूक चिन्ह म्हणून देण्यास आयोगाने नकार दर्शवला. उगवता सूर्य हे चिन्ह द्रमुक पक्षाला यापूर्वीच दिलेले आहे. त्यामुळे ठाकरे गटाच्या यादीत मशाल हे एकमेव चिन्ह उरल्यामुळे त्यांना मिळाले. मात्र शिंदे गटाच्या यादीत कोणतेही चिन्ह उरले नसल्यामुळे आता नव्याने तीन चिन्हे सुचवण्याचे आदेश निवडणूक आयोगाने शिंदे गटाला दिला आहे.

### 'मशाल' चिन्हानेच दिला शिवसेनेला पहिला खासदार



धनुष्यबाण गेल्यानंतर मिळालेले मशाल हे कधीकाळी शिवसेनेचे चिन्ह होते. औरंगाबादमध्ये याच मशालीने शिवसेनेला पहिला खासदार निवडून दिला होता. १९८९ मध्ये औरंगाबाद लोकसभा मतदारसंघातून शिवसेनेने मोरेश्वर सावे यांना उमेदवारी दिली होती. तेव्हा त्यांची निशाणी मशालच होती. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी मराठवाडा सांस्कृतिक मंडळावर तेव्हा मशाल चिन्हावरच मते मागितली होती. लोकसभा निवडणुकीत याच चिन्हाने शिवसेनेच्या लोकसभेतील विजयाची द्वारे खुली केली होती. खऱ्या अर्थाने शिवसेनेच्या विजयाची मशाल तेव्हाच पेटली होती. मशाल या चिन्हावर लोकसभा निवडणुकीत विजय मिळवल्यानंतर १९९८ चा अपवाद वगळता २०१९ पर्यंत औरंगाबाद लोकसभेवर शिवसेनेचाच भगवा कायम फडकत राहिला होता.

# अनोळखी वाहनाच्या धडकेने दुचाकीचालक ठार

## हिरजच्या ऋतुराज हॉटेल येथील घटना

सुराज्य/सोलापूर




हिरज (ता.उत्तर सोलापूर) येथील ऋतुराज हॉटेल जवळ अनोळखी वाहनाच्या धडकेने दुचाकी वरील काशिनाथ बेलप्पा काटकर (वय ४५ रा. हिरज) हे गंभीर जखमी होऊन जागीच मरण पावले. हा अपघात आज सोमवारी पहाटे उघडकीस आला.

काशिनाथ काटकर हे शिवाजीनगर बाळे येथे राहण्यास आहेत. रविवारी रात्री १० वाजेच्या सुमारास ते हिरज येथे यात्रेसाठी म्हणून दुचाकीवरून निघाले होते. त्यावेळी विद्यापीठ ते हिरज मार्गावर हा अपघात घडला. पहाटेच्या सुमारास याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल केले. या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली असून हवालदार रहीम सय्यद पुढील तपास करीत आहेत.



मंगळवेढा येथील समूह गायन स्पर्धेत बहारदार गीते सादर करण्यात आली. दुसऱ्या छायाचित्रात बोलके चित्र रेखाटण्यात विद्यार्थी मग्न होते. युवा महोत्सवाचे सविस्तर वृत्त पान ६ वर....

# पाण्याच्या टँकरची धडक; दीड वर्षांचा बालक ठार

**सोलापूर** : वेगाने जाणाऱ्या टँकरच्या धडकेने रस्त्यावर खेळणारा २० महिन्याचा बालक गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात काल रविवारी सकाळी बिबीदारफळ (ता.उत्तर सोलापूर येथे घडला.

आरुष सर्वगोड (वय २० महिने रा. बीबीदारफळ) असे मयत झालेल्या बालकाचे नाव आहे. या प्रकरणात तालुक्याच्या पोलिसांनी पाणी टँकरचा ड्रायव्हर इस्माईल नजीरअहमद मंगलगिरी (रा.बेगमपेठ, सोलापूर) याला अटक करून गुन्हा दाखल केला. काल सकाळी ११ वाजेच्या सुमारास आरुष सर्वगोड हा बालक घरासमोर खेळत होता. त्यावेळी बिबीदारफळ बस स्थानकाकडून सावळेश्वरच्या दिशेने वेगाने जाणारा एमएच०४-सीजी-०५४५ या क्रमांकाचा खाजगी टँकर समोरून धडकल्याने आरुष हा गंभीर जखमी झाला होता. त्याला खाजगी रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारादरम्यान मयत झाला. या अपघाताची फिर्याद मयत आरुष याची आजी सोनाली दादा सर्वगोड यांनी पोलिसात दाखल केली. पुढील तपास फौजदार राठोड करीत आहेत.

# बनावट कागदपत्रे तयार करून प्लॉट विकल्याप्रकरणी चौघांवर गुन्हा

सुराज्य/सोलापूर




लिमयेवाडी येथील भगवान हरिभाऊ आलट यांनी १९८२ मध्ये विकलेल्या प्लॉटची बनावट कागदपत्रे तयार करून त्यांच्या नावाची बोगस व्यक्ती उभी करून तोच प्लॉट तिघांना विक्री केल्याप्रकरणी चौघांविरुद्ध सलगर वस्ती पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान, लिमयेवाडीतील जुना सर्व्हे क्र. ४१२ आणि नवीन सर्व्हे नं. ४१६ यातील दोन मिळकतींवर रंजना विजय जाधव (रा.मधुबन हौसिंग सोसायटी, लिमयेवाडी) यांची मालकी व कब्जा आहे.

तरी देखील १३ डिसेंबर २०१० रोजी रंजना जाधव यांच्या लगतचा प्लॉट अलाट यांच्या नावाची बनावट व्यक्ती उभी करून दिपा लक्ष्मण जाधव हिने खरेदी केला. त्यानंतर तोच प्लॉट दिपा जाधव हिने १८ फेब्रुवारी २०२० रोजी वसंत तानाजी जाधव (रा. वांगी रोड, सोलापूर) यास विकला. वसंत जाधवच्या नावाची नोंदणी होताच त्याने तो प्लॉट रंजिता अंबादास जाधव हिला विकण्यात आला. त्यावेळी अंबादास पेंटप्पा जाधव (रा.सेटलमेंट फ्रि कॉलनी नं.२) याने साक्षीदार म्हणून स्वाक्षरी केली. वास्तविक पाहता भगवान अलाट यांनी तो प्लॉट १९८२ मध्येच विकला होता. चौघांनी संगनमत करून त्याची बनावट खरेदी-विक्री केली आणि आता माझ्या प्लॉटवर ते कब्जा करीत असल्याप्रकरणी रंजना जाधव यांनी न्यायालयात धाव घेतली होती.न्यायालयाच्या आदेशानंतर सलगर वस्ती पोलिसांत गुन्हा दाखल झाला असून, चौघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस उपनिरीक्षक सचिन मंद्रुपकर तपास करीत आहेत.

# न्यायालयीन कोठडीत असलेल्या पीएफआयच्या कार्यकर्त्यास मुक्त करण्याचा आदेश

**सोलापूर** : न्यायालयीन कोठडीत असलेला पीएफआयचा कार्यकर्ता असिफ शौकत शेख (वय ४० रा.सहारा नगर) यास मुक्त करण्याच्या आदेश प्रमुख न्यायाधीश शब्बीर अहमद औटी यांनी सोमवारी दिला.

आसिफ शौकत शेख याला विजापूर नाका पोलिसांनी २७ सप्टेंबर रोजी पहाटेच्या सुमारास पीएफआय या संघटनेशी संबंधित असल्याच्या कारणावरून त्याच्या राहत्या घरातून अटक करून ६ ऑक्टोबर पर्यंतची न्यायालयीन कोठडी घेतली होती. मुदत संपल्यानंतर पोलिसांनी पुन्हा त्याच्या कोठडीत ११ ऑक्टोबर पर्यंतची वाढ करून घेतली.



या आदेशाविरुद्ध ॲड.रियाज एन.शेख यांनी सत्र न्यायालयात रिव्हिजन अर्ज दाखल केला. अटकेतील आसिफ शेख याच्याविरुद्ध धार्मिक भावना दुखावल्याचे, शरीराविषयी गुन्ह्याचे आणि मालमत्तेच्या नुकसानीविषयी आजपर्यंत एकही गुन्हा दाखल नाही.

शिवाय सणाचे दिवस संपल्याने त्याच्या न्यायालयीन कोठडीत वाढ करणे चुकीचे आहे, असा युक्तिवाद मांडला होता. तो ग्राह्य धरून सत्र न्यायालयाने कोठडीतील शेख यास मुक्त करण्याचा आदेश दिला. या प्रकरणात आरोपींतर्फे ॲड. रियाज एन. शेख यांनी काम पाहिले.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



जिथे सरळ मार्ग नसतात, तेथे 'लोन' मार्ग तयार होतो!!

कल्याण
389-09-270

मेन बाजार
490-39-126

# परिवहन उपक्रमातील डिझेल घोटाळा प्रकरणी विभागीय चौकशी होणार

सुराज्य/सोलापूर

**महापालिका परिवहन उपक्रमात उघडकीस आलेल्या डिझेल घोटाळा प्रकरणी विभागीय चौकशी करण्यात येणार असून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे आदेशही दिल्याची माहिती महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी दिली.**

सोलापूर शहरातील लोकसंख्येच्या दृष्टीने किमान १५० बसेस मार्गावर असणे अपेक्षित आहे. सध्या केवळ २० बस मार्गावर आहेत. विडी घरकुल व कुंभारी वगळता यातील बससेवा शहराबाहेरच देतात. २०१४ मध्ये केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत घेण्यात आलेले १०० बस चेसी क्रॅकमुळे सहा महिन्यातच अडगळीत पडल्या. चेसींक्रॅक बसेससाठी न्यायालयीन वाद सुरू झाला आणि गेल्या आठ वर्षांपासून अशोक लेलँड कंपनीच्या बस डेपोत धूळखात पडून आहेत.



कंपनीसोबत झालेल्या करारामध्ये अनेक त्रुटी असल्याचे आयुक्त पी. शिवशंकर यांच्या निदर्शनास आले.

या चेसींक्रॅक बस खरेदी प्रकरणी तत्कालीन आयुक्त चंद्रकांत गुडेवार यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांच्या नावांसह शासनाला अहवाल पाठविला. यांची विभागीय चौकशी होऊन दोषींवर गुन्हे दाखल करण्यासही शासनाने कळविले आहे. दरम्यान, न्यायालयाने परिवहन विभागाचे पाच वर्षांचे लेखापरीक्षण करण्याचे आदेश दिले. त्यानुसार सुरू असलेल्या लेखापरिक्षेत परिवहन उपक्रमातील दहा हजार लीटर डिझेल घोटाळा निदर्शनास आला.

याप्रकरणी तत्कालीन परिवहन व्यवस्थापक श्रीकांत मायकलवारसह १६ जणांना नोटिसा बजावल्या होत्या. नोटिसांचा खुलासा प्राप्त होताच संबंधित दोषींची विभागीय चौकशी करण्याचे आदेश दिले होते. परिवहनमधील रेकॉर्ड न ठेवणे, अपुऱ्या कागदपत्रांसंबंधीच्या २५ त्रुटी लेखापरीक्षकांनी नोंदविल्या आहेत. डिझेल घोटाळा प्रकरणी विभागीय चौकशी बरोबरच आता फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत असेही महापालिका आयुक्त शिवशंकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

### इलेक्ट्रिक बस योजना जाहीर होण्याची शक्यता

केंद्र शासन व राज्य शासनाचा आर्थिक हिस्सा जमा करून इलेक्ट्रिक बस योजना शासनाकडून लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. ही योजना जाहीर झाल्यानंतर सोलापूर महापालिकेला इलेक्ट्रिक बस मिळू शकतील. त्या योजनेची आता प्रतीक्षा असल्याचेही महापालिका आयुक्तांनी सांगितले.

# भूमिपुत्र हरपला...

उत्तरप्रदेशचे खंदे नेतृत्व तथा समाजवादी पक्षाचे संस्थापक आणि माजी मुख्यमंत्री मुलायम सिंह यादव यांच्या जाण्याने जनता परिवारातील समाजवादी नेत्यांची जी फळी होती, त्यातील एक महत्त्वाचा नेता आपल्यातून निघून गेला आहे. जनता परिवार फुटल्यानंतर ज्या त्या राज्यातील समाजवादी नेत्यांनी राजकीय अस्तित्वासाठी आपापली राजकीय चूल मांडली. उत्तर भारतात समाजवादी नेत्यांचा एकेकाळी पगडा होता. त्यानुसार मुलायम यांनी यूपीत तर नितीश कुमार यांनी बिहारात आपला स्वतंत्र पक्ष स्थापन केला. गुजरातमध्येही जनता दलाचे अस्तित्व होते. पण ते फार काळ टिकले नाही. कर्नाटकात माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांनी प्रादेशिक पक्ष स्थापन करून आपल्या मुलाची (कुमारस्वामी) राजकीय सोय करून ठेवली. मुलायम हे तसे जनता दलाच्या परिवारातीलच पण अयोध्येत बाबरी मशीद पाडल्यानंतर एका नव्या राजकीय ध्रुवीकरणाला सुरुवात झाली. त्यातूनच त्यांनी समाजवादी पक्षाची स्थापना केली. त्यामुळे भाजप व कांशीराम-मायावती यांच्या बहुजन समाज पक्ष यांना मोठा पर्याय उभा राहिला. भाजप-बहुजन समाज पक्ष यांनी सत्तेसाठी एकी दाखवली पण मुलायम यांनी तशी तडजोड केली नाही. स्वबळावर त्यांनी सत्ता आणली आणि तीनदा ते मुख्यमंत्री झाले. एकमात्र केंद्रीय सत्तेत मुलायम यांनी काँग्रेसला आश्रय दिला होता. अमेरिकेशी अणुकरार केल्यानंतर केंद्रातील काँग्रेसप्रणित यूपीए सरकारचा माकपवाल्यांनी पाठिंबा काढून घेतल्यानंतर मुलायम यांनी काँग्रेसला पाठिंबा दिल्यामुळे युपीए सरकार तगले होते. त्याचवेळी त्यांनी संसदेत खासदार म्हणून आपली कारकीर्द गाजवली होती. यूपीत नेताजी ही त्यांची खास ओळख होती. तरुणपणी ते कुस्ती खेळायचे. त्यांनी काही काळ कुस्तीचे मैदानही गाजवले. यानंतर काही काळ प्राध्यापक म्हणून अध्यापनाची जबाबदारी घेतली.त्यामुळे त्यांचे



वक्तृत्व अमोघ होते. राजकीय गुरू नत्थू सिंह यांच्या सानिध्यात आल्यानंतर त्यांनी जसवंतनगर विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात पहिले पाऊल ठेवले. १९६७ साली ते पहिल्यांदा आमदार झाले. १९८२ ते १९८५ या काळात ते विधानपरिषदेचे सदस्य होते. लोहिया आंदोलनात ज्यांनी ज्यांनी हिरिरीने भाग घेतला, त्यात ते एक तरुण नेते होते. पक्ष स्थापन केल्यानंतर त्यांनी एकापाठोपाठ आपल्या प्रतिस्पर्ध्यांना एक करून धूळ चारत गेले. ते आठ वेळा उत्तर प्रदेश विधानसभेवर निवडून गेले होते. मुलायम सिंह यादव यांना तीन वेळा उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्रिपदी बसण्याचा मान मिळाला. व्ही. पी. सिंग यांच्या काळात केंद्र सरकारमध्ये संरक्षण खात्यासारख्या अत्यंत महत्त्वाच्या खात्याचे मंत्रिपद त्यांनी भूषविले होते. त्यांचे नेतृत्व जेपी यांच्या चळवळीतून उभे राहिले. कायम जमिनीशी नाळ असणारा नेता अशी त्यांची ओळख राहिली. समाजातील मागास जातींना सोबत घेऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याची त्यांची ऊर्मी वादातीत राहिली. कायम आंदोलनाच्या माध्यमातून सरकारी पक्षाला जाब विचारणे आणि मागास जातींना न्याय मिळवून देण्याचे काम नेताजींनी केले. त्यांच्या जाण्याने उत्तर प्रदेशच नव्हे तर देशातील समाजवादी चळवळीवर मोठा आघात झाला आहे. आज भारत आणि चीन हा सीमावाद मोठ्या जोरदारपणे लढला जात असताना मुलायम यांचा संरक्षण मंत्रिपदाचा कार्यकाळ कायम लक्षात राहण्यासारखा आहे. कारण संरक्षण मंत्री असताना त्यांनी कायम चीनच्या वाढत्या धोक्याची जाणीव करून दिली. त्यातून त्यांची दूरदृष्टी स्पष्ट झाली होती.आज भारताला तोच अनुभव येतोय. पाकिस्तान आपला शत्रू आहेत पण चीनला वेळीच रोखले पाहिजे हे त्यांनी काही दशकाअगोदरच ओळखले होते. नेताजी हे यूपीच्या राजकारणातील महत्त्वाचे नेते पण शेतीविषयीची विलक्षण आवड त्यांना होती. त्यामुळेच भूमिपुत्र म्हणून त्यांना संबोधले जाते. त्याचे वडील सुघर सिंह आणि आई मारुतीदेवी हे दोघेही शेती करायचे. सुघर सिंह यांची इच्छा होती की मुलायम यांनी पैलवान व्हावे. स्वत: त्यांनाही कुस्तीची आवड होती. कुस्तीत आपल्या डावपेचामुळे प्रतिस्पर्ध्याला चीतपट करायचे. याच डावपेचाचा त्यांनी राजकारणातही उपयोग केला आणि मुख्यमंत्रिपद सांभाळले. राम मनोहर लोहिया यांनी नहर रेट आंदोलनाची घोषणा केली. यात मुलायम सिंहही सहभागी झाले होते. लोहिया यांच्यासह काही नेत्यांना तुरुंगात टाकण्यात आले. यात ते देखील होते. यावेळी त्यांचे वय अवघे १५ वर्षे होते. तेव्हापासून लोहिया आणि त्यांचे घनिष्ठ संबंध निर्माण झाले. तिथून पुढे ते कायम राहिले.तीनदा पंतप्रधानपदाची संधी आली पण तिने हुलकावणी दिली.पक्षाचा देशात विस्तार होऊ शकला नाही. ही खंत शेवटपर्यंत त्यांना लागून होती. त्यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन.

---

# भारतीय संघाची शक्तीपरीक्षा

**क्रीडा जगत**



२००७ झाली महेंद्र सिंग धोनीच्या नेतृत्वाखाली जिंकलेल्या साउथ आफ्रिकेतील पहिल्या विश्वचषकानंतर आता मेलबोर्नला ८ वा विश्वचषकाचा अध्याय सुरू होत आहे. देशासाठी सर्वस्वपणाला लावून लढणाऱ्या सर्वोत्तम खेळाडूंमुळे विश्वचषकाचा थरारच वेगळा असतो. आपापल्या देशासाठी झुंजणाऱ्या खेळाडूंना बघण्याचा आनंद, त्याच बरोबर अलीकडच्या काळातील क्रीडा स्पर्धेतदेखील देशप्रेमाच्या जोडल्या गेलेल्या भावनांमुळे, अवघ्या क्रिकेट विश्वातील समस्त देशवासीय ह्या विश्वचषकासारख्या सोहळ्याची आतुरतेने वाट पाहत असतात.

पहिलाच विश्वचषक अनपेक्षितरीत्या माहीच्या संघाने जिंकून दिल्यामुळे टीम इंडियाकडून भारतीय क्रिकेट रसिकांच्या प्रचंड अपेक्षा असतात. साहजिकच भारतीय खेळाडू अतिशय दडपणाखाली असतात. त्यामुळे अपेक्षाभंगाचे दु:ख पण तितकेच तीव्र असते. २०२१ च्या ऑक्टोबरमध्ये विश्वचषकात पाकिस्तान संघाकडून प्रथमच पराभूत झाल्यामुळे आपण सर्वांनीच तो अनुभव घेतलाच आहे. त्यानंतर विराट कोहलीने सोडलेले कर्णधारपद या सगळ्या गेल्या वर्षातील ताज्या घडामोडी सर्वांना ठाऊक आहेतच.

> १६ ऑक्टोबर २०२२ पासून ऑस्ट्रेलियात मेलबोर्नच्या भव्य क्रिकेट मैदानावर ८ वा आयसीसीटी-ट्वेंटी विश्वचषकाचा धमाका सुरू होत आहे. २००८ साली सुरू झालेल्या आयपीएल क्रिकेट स्पर्धेमुळे टी-ट्वेंटी हे झटपट प्रत्येकी २० षटकांचे क्रिकेट आता भारतात चांगलेच लोकप्रिय झाले आहे. बघता बघता २००८ पासून २०२२ पर्यंत आयपीएलचे १५ हंगाम झालेसुद्धा. क्रिकेट विश्वातील निवडक, धडाकेबाज लोकप्रिय खेळाडूंमुळे टी-ट्वेंटी भारतात चांगलेच रुजले आहे. विविध क्लब मालकांचे संघ यात असतात व साडेतीन चार तास भरपूर मनोरंजनाची हमी असते. भारतीय फलंदाजांनी आपल्या लौकिकानुसार खेळ केल्यास भारतीयांना दुसऱ्यांदा टी-ट्वेंटी विश्वचषक जिंकण्याची निश्चितच संधी आहे.

२००७ झाली सुरू झालेल्या विश्वचषकापासून २०२१ पर्यंतच्या ७ आवृत्तींचा थोडक्यात आढावा घेऊ या. त्यानुसार विजयाची हॅट्रिक तर जाऊ द्या, कोणत्याही देशाने ही स्पर्धा आत्तापर्यंत सलग दोनदा जिंकलेली नाही. वेस्ट इंडीजने सर्वाधिक दोन वेळेस २०१२ श्रीलंकेत व २०१६ साली भारतातील स्पर्धेत अजिंक्यपद मिळवले. पाकिस्तानने २००९ इंग्लंड, इंग्लंडने २०१० साली वेस्ट इंडीजमध्ये, श्रीलंकेने २०१४ मध्ये बांगलादेशात तर ऑस्ट्रेलियाने दुबईत मागील २०२१ च्या स्पर्धेत अजिंक्यपद मिळविले.

ऑस्ट्रेलियासारख्या बलाढ्य संघालासुद्धा पहिल्या सहा प्रयत्नात अपयशाचा सामना करावा लागला. वर्षानुवर्षे मायदेशीचे आयपीएल खेळून देखील २००७ च्या अजिंक्यपदांनंतर भारत एकदाच अंतिम फेरीत पोहचू शकला तो म्हणजे २०१४ साली बांगलादेशातील ढाका येथे, पाचव्या आवृत्तीत. श्रीलंकेने तो विजेतपदाचा सामना ६ गडी राखून आरामात जिंकला होता.

परत भारतीय संघाच्या कामगिरीकडे वळूया. वर आधी सांगितल्याप्रमाणे गेल्या स्पर्धेत दुबईत पाकिस्तानने भारताचे आव्हान संपविले. गेल्या सप्टेंबर महिन्यातील आशिया चषकातील बलाढ्य भारतीय संघाच्या अनपेक्षित पाकिस्तान व श्रीलंकेकडून झालेले पराभव सोडल्यास रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाची कामगिरी अफलातून आहे. दोन देशातील सर्वच स्पर्धा भारताने खिशात घातल्या आहेत. अगदी बलाढ्य ऑस्ट्रेलिया व द. आफ्रिकेलाही भारतात का होईना भारताने पराभूत केले आहे.

दुबईतील २०२१ च्या परभवानंतर रोहित शर्मा व नवा प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी धोरणात आमूलाग्र बदल केला. भारतीय संघात रोहित शर्मा, के. एल. राहुल, विराट कोहली, सूर्यकुमार यादव, हार्दिक पंड्या, श्रेयस अय्यर, ऋषभ पंत, दिनेश कार्तिक असे एकापेक्षा एक धडाकेबाज, आक्रमक फलंदाज भारतीय संघात आहेत. त्यामुळे भारतीय संघाने नवीन नीती अवलंबिली आहे. ती म्हणजे सुरुवातीच्या षटकापासून, अगदी पहिल्या चेंडूपासूनच प्रतिस्पर्धी गोलंदाजीवर बेधडक, जोरदार आक्रमण करायचे.

विशेषत: प्रथम फलंदाजी करताना तर या धडाकेबाज फलंदाजीच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघाच्या आवाक्याबाहेर १८० , २०० च्याही पुढे धावसंख्या उभारून त्यास सामन्यातून पूर्णपणे हद्दपार करायचे. दहापैकी एखादोन वेळेस यात अपयश आले तरी हे धाडसी धोरण सोडायचे नाही व वर उल्लेख केलेल्या सर्व स्ट्रोक प्लेयर्सच्या कौशल्याला पूर्णपणे वाव द्यायचा. यात गेल्या वर्षभरात सर्वाधिक योगदान दिले आहे तो आपल्या देदीप्यमान, अफलातून कामगिरीने सूर्यासारखे तळपणाऱ्या मुंबईकर सूर्यकुमार यादवने. दुखापतींनंतर सूर सापडलेले हार्दिक पंड्या आणि के. एल. राहुल तसेच विश्रांतीनंतर पुन्हा पूर्वीपेक्षाही जोरदार आक्रमक कामगिरीला सुरुवात केलेल्या विराट कोहली, नवोदित दीपक हुडा व अर्थातच कर्णधार रोहित शर्मा व शेवटच्या काही षटकात जोरदार कामगिरी करणारा दिनेश कार्तिक या भारतीय फलंदाजांनी आपल्या लौकिकानुसार खेळ केल्यास भारतीयांना दुसऱ्यांदा टी-ट्वेंटी विश्वचषक जिंकण्याची निश्चितच संधी आहे.

भारतीय संघाचा पहिलाच सामना २३ ऑक्टोबरला परंपरागत प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी आहे. वर्षभरातील दोन पराभवांची परतफेड करण्यास रोहित शर्मा व कंपनी अतिशय उत्सुक आहे. मोहिमेवर जाण्यापूर्वी जसप्रीत बूमराहच्या दुखापतीमुळे अनुपस्थितीचा धक्का भारताला पचवावा लागला आहे, पण भुवनेश्वर कुमार, टी-ट्वेंटीतील भारताचा सर्वाधिक यशस्वी यजुवेंद्र चहल,अनुभवी रविचंद्रन अश्विन, रवींद्र जडेजाची गोलंदाजीतील पोकळी भरून काढणारा अक्षर पटेल आणि बूमराहच्या जागी चमूत येणारा बहुधा मोहम्मद शामी यांना ऑस्ट्रेलियातील खेळपट्ट्यांवर अर्शदीप सिंग व हर्षल पटेल यांची साथ मिळेल व भारत जोरदार कामगिरी करेल, अशी जोरदार आशा व इच्छा कोट्यवधी भारतीय शौकीन बाळगून आहेत. बघूया दोन आठवड्यांनी झटपट क्रिकेटचा थरार.

**- समीर रकटे.**

---

# उद्योजकांसाठी उपयुक्त जोहॅरी विंडो

**टुडेज् ब्लॉग**

**'जोहॅरी विंडो' हे सुसंवाद साधण्याचे एक उत्तम नमुना साधन आहे. तरी त्यात संवादातील अस्पष्टता, असंदिग्धता, व्याकरणातील चुका, शब्दांची अयोग्य निवड, विचारातील गोंधळ, चुकीचे तर्क अशा गोष्टींचाही विचार व्हायला हवा. शब्दांबरोबरच 'देहबोली'चाही विचार व्हायला हवा. मनुष्य संबंध ही काही गणितासारखी शास्त्रीय गोष्ट नाही. त्यात अनेक नाजूक आणि गुंतागुंतीच्या प्रक्रियांचा समावेश असतो, परंतु 'जोहॅरी विंडो'सारख्या तंत्राचे ज्ञान असल्यास आपण प्रभावी संवाद आणि अर्थपूर्ण संबंध निर्माण करू शकतो.**

उद्योजक आणि व्यावसायिकांना त्यांचा व्यवसाय वाढविण्यासाठी अनेक नवीन ग्राहक जोडावे लागतात आणि त्यासाठी नेहमी नवीन लोकांशी संवाद साधावा लागतो. उद्योग-व्यवसायात दोन गोष्टी फार महत्त्वाच्या असतात, त्या म्हणजे ग्राहक म्हणजे दुसरी व्यक्ती आणि दुसरे म्हणजे त्या व्यक्तीने आपले उत्पादन किंवा सेवा पैसे देऊन विकत घेणे आणि यासाठी कायम करावा लागतो तो संवाद. विशेषकरून नवीन ग्राहक जोडताना आपल्याला त्याबद्दल फारशी काही माहिती नसते आणि आजच्या इंटरनेट मार्केटिंगच्या जमान्यात खरा ग्राहक कोण आणि फसवा ग्राहक कोण हे ओळखणे फार अवघड झाले आहे.

हे तंत्र अमेरिकेतील मानसतज्ज्ञ जोसेफ लुफ्त आणि हॅरी इन्ग्रम यांनी प्रथम तयार केले आणि त्यांच्या दोघांच्याही पहिल्या नावातील जो आणि हॅरी यांचा वापर करून या तंत्राला 'जोहॅरी विंडो' असे नाव दिले. हे तंत्र प्रभावी ठरण्याचे मुख्य कारण म्हणजे त्याच्या वापराने माणसातील अंतर्भूत कौशल्ये सुधारतात. त्याच्या वागण्यात आणि भावनांमध्ये स्पष्टता येते. सहकारी वृत्ती वाढते. व्यक्तिगत आणि गटातटातील संबंध सुधारतात. त्याच्या वापराने माणसाच्या भावना, अनुभव, मतं, दृष्टिकोन कौशल्य, उद्देश, हेतू आणि प्रेरणा, व्यक्ती-व्यक्तीतील आणि गटागटातील गुंतागुंतीचे संबंध यांचे चार प्रकारे यथार्थ दर्शन घेता येते.

या तंत्रात माहिती, भावना, प्रेरणा इत्यादी गोष्टी व्यक्तीला किंवा संबंधात येणाऱ्या माणसांना ही माहिती ज्ञात आहे किंवा ज्ञात नाही या पद्धतीत विभागून समजावून घेता येते. हे तंत्र खिडकीच्या चार तावदानांसारखे काढण्याची, दाखविण्याची पद्धत आहे. म्हणून याला विंडो किंवा चौकट असे म्हटले जाते. परस्पर संबंधातली माहिती देवाण-घेवाण या प्रक्रियेमुळे या चौकोनांच्या क्षेत्रफळात, व्याप्तीत फरक पडतो म्हणजे या चौकोनांचा आकार मोठा किंवा लहान होऊ शकतो.तक आवडते हे सांगितलेले नाही ही माहिती माझ्या आखलेल्या चौकोनात आहे. मी जेव्हा मला साने गुरुजी यांचे श्यामची आई' हे पुस्तक आवडते असे सांगतो, तेव्हा आपोआपच माझे झाकलेल्या चौकोनाचे क्षेत्र कमी होते आणि ज्ञात क्षेत्राचा चौकोन मोठा होतो. आयुष्यातल्या कितीतरी गोष्टी आपण इतरांपुढे मांडलेल्या नाहीत. आपले संबंध जसे वाढत जातील आणि परस्पर विश्वास निर्माण होईल त्यानंतर खुल्या मनाने अशी माहिती इतरांपुढे ठेवली जाईल. आपल्यात जवळीक निर्माण होईल. या प्रक्रियेला स्वत:बद्दलची माहिती स्वत:च प्रकट करणे असे म्हणता येईल.

इतर लोकही आपल्याबद्दलची त्यांची मते




व्यक्त करतात; पण या सर्व प्रक्रिया खूप सावधपणे आणि हुशारीने करावयाला हव्यात. कारण यात माणसाचे वागणे, हेतू, भावभावना, प्रेरणा, स्वार्थ यांचा समावेश येतो. यातून आपल्या स्वत:च्या आणि आपल्याजवळच्या व्यक्तींची अपूर्णता, अकार्यक्षमता, दुर्बलता, अपात्रता, नापसंती, दोष परावलंबी या भावना व्यक्त होत असतात आणि त्याच्या तीव्र प्रतिक्रियाही उद्भवू शकतात. अर्थात निसर्गाने आपल्या प्रत्येकाजवळ या गोष्टी नाकारणे, त्याकडे दुर्लक्ष करणे अथवा त्यास आपले स्वत:चे स्पष्टीकरण देणे, असे संरक्षक कवचही दिले आहे. तेव्हा या सर्वांचा काळजीपूर्वक वापर व्हायला हवा.

'जोहॅरी-विंडो'मागील महत्त्वाच्या संकल्पना

१) व्यक्तिश: आपण आपल्याबद्दलची खरी माहिती देऊन आपल्यात आणि परस्परांत संबंध निर्माण करू शकतो.

२) इतर संबंधित व्यक्तींबद्दल असे ज्ञान मिळवून आपण आपला संपर्क व्यवहार जास्त अर्थपूर्ण करू शकतो.

३) जोहॅरी विंडो' ही संकल्पना आपल्या कार्यगटात आणि संबंधित व्यक्तींना स्वत:बद्दलची माहिती हळूवारपणे सांगून इतरांकडूनदेखील त्यावर प्रतिक्रिया घेण्याचे महत्त्व पटवून देऊन आपल्या परस्पर व्यवहारात अर्थपूर्ण संबंध प्रस्थापित करू शकते. त्यामुळे आपापसातील प्रश्न सुटून एक टीमगट म्हणून आपण उत्तम परिणाम मिळवू शकू.

स्वत:बद्दलची माहिती खुली करताना घाई करू नका. कारण निरुपद्रवी माहिती खुली केल्यामुळे विश्वास निर्माण होतो, परंतु काही माहिती अशी असू शकते की त्यामुळे लोकांचा आदर दूर होऊन आपण कमकुवत ठराल. याबाबत घाई करू नका. आपण कोणती आणि कशी माहिती देतो याची काळजी घ्या. काही समाजात अशी माहिती खुल्या मनाने स्वीकारली जात नाही. अशा ठिकाणी आपण गुन्हेगार ठराल आणि आपली पत घालवून बसाल. संवेदनशील राहा आणि हळूहळू सुरुवात करा. थोडक्यात माहितीची देवाण-घेवाण करताना सजगता आणि समानता ठेवायला हवी.- **राम डावरे.**

---

**बोधकथा**

## मुंगी व कोशातला किडा



एकदा एक मुंगी आपले खाद्य शोधत फिरत असता कोशातून नुकताच एक किडा बाहेर पडलेला तिला दिसला. कोशातून बाहेर पडलेले त्याचे पाय तो हळूहळू हालवीत होता. ते पाहून मुंगी म्हणाली, 'अरेरे, काय ही तुझी स्थिती? मला वाटेल तिकडे फिरता येतं. पण तुला या कोशात बंदीवान होऊन दिवस काढावे लागतात. तेव्हा तुझ्या व माझ्या स्थितीत फारच अंतर आहे असं म्हटले पाहिजे.' यावर किडा काहीच बोलला नाही. पुढे काही दिवसांनी ती मुंगी पुन: तेथे गेली असता त्या किड्याचे फक्त कवच मात्र तेथे पडले असून तो किडा कोठेतरी निघून गेला आहे असे तिला दिसते. ती इकडे तिकडे फिरत आहे तोच एक सुंदर पतंग आपल्या पंखांनी तिला वारा घालत असताना तिला दिसला. तो तिला म्हणाला, 'अगं, त्यादिवशी बंदिवान म्हणून तू माझी कींव करीत होतीस, माझ्यापेक्षा तुझी स्वत:ची स्थिती बरी असं म्हणत होतीस, तोच कोशातला किडा मी आहे हे लक्षात घे. आपल्याला वाटेल तिकडे फिरता येतं अशी बढाई मारायची असेल तर खुशाल मार. तोपर्यंत मी सहज थोडा आकाशात फिरून येतो.' इतके बोलून त्याने एक भरारी मारली व उंच आकाशात गेला.

**तात्पर्य : - संकटात असलेला माणूस पुन: कधीही वर डोके काढणार नाही अशा समजुतीने त्याचा उपहास करून त्याच्याजवळ स्वत:च्या वैभवाबद्दल बढाई मारणे हा मूर्खपणा होय.**

---

**जन्म हा अखेरचा**

## धर्माचारस्थल - १



जो मोठा असतो त्याला फार सावधपणे वागावे लागते.

येथे वेदाची आज्ञा आहे - 'धर्म चर!' धर्म काय आहे? तर वडीलधाऱ्यांचे आचरण हाच धर्म होय. धर्माची व्याख्या अशी केली आहे - 'यतोभ्युदय नि:श्रेयस: सिध्दि स धर्म: ।'

ज्याच्या आचरणामुळे मनुष्याला ऐहिक सुखांची प्राप्ती होते आणि मुक्तिचाही लाभ होतो तो 'धर्म' होय. अभ्युदय आणि नि:श्रेयस या दोन मनुष्याच्या अभिलाषा असतात. प्रपंचातील सर्व सुखे आणि सर्व सुखांची साधने आपल्याला मिळावीत असे प्रत्येकाला वाटते. सांसारिक सुखे भोगलेल्या जीवाच्या मनात कधीतरी मुक्तीची इच्छा उत्पन्न होते. मनुष्य जीवनाचे अंतिम लक्ष्य भोग हे नाही. परमेश्वराने तुम्हांला भोग यासाठी दिले आहेत की, तुम्ही कधीतरी त्यापासून मुक्त व्हावे. वासनेचा नाश होऊन विरक्ति उत्पन्न व्हावी यासाठी ईश्वराने मनुष्याला भोग प्रदान केले आहेत.

मनुष्याला ऐहिक भोग (अभ्युदय) आणि मुक्ती (नि:श्रेयस) हे दोन्ही हवे असतात. त्यासाठी धर्माचे पालन करावे लागते. ज्याच्यामुळे तुमचा ऐहिक अभ्युदय होतो आणि अंती मुक्ती मिळते, त्याला 'धर्म' असे म्हणतात. धर्मकार्य करण्याचा अधिकार केवळ मानवालाच आहे, अन्य कोणत्याही जीवमात्राला नाही.

**(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

---

**जनमानस**

## अमिताभ : अभिनयाचे विद्यापीठच!



आपल्या अभिनयाच्या जोरावर गेली चाळीस वर्षाहून अधिक काळ रसिकांच्या हृदयसिंहासनावर विराजमान असलेला अभिनेता म्हणजेच महानायक अमिताभ बच्चन होय. आज दि.११ ऑक्टोबर रोजी वयाची ८० वर्ष पूर्ण करीत आहेत. नुकताच त्यांना भारतीय चित्रपट सृष्टीतील मानाचा समजला जाणारा दादासाहेब फाळके पुरस्कारही त्यांना देण्यात आला.

सात हिंदुस्थानी ते बदला पर्यंतचा प्रवास हा अतिशय खडतर आणि चढउताराचाच होता. यश अपयश राजकारणातील आलेला अनुभव आणि आर्थिक डबघाईत असताना 'कौन बनेगा करोडपती' या ऐतिहासिक मालिकेने हात दिला. तरीही वयाच्या आणि कारकीर्दीच्या या वळणावर व्यावसायिकदृष्ट्या त्यांना असणारी मागणी कायम आसलेला ते एकमेव अभिनेता आहेत. चित्रपट असो किंवा जाहिरात किंवा शासनाच्या कल्याणकारी महत्त्वाचे निवेदन असो त्यांनाच घेऊन ती पूर्ण केली जाते. हेच त्यांच्या अभिनयाचे वैशिष्ट्ये मानावे लागेल. म्हणूनच आत्तापर्यंत २२६ हून अधिक चित्रपटात वेगवेगळ्या भूमिका करुन त्या अजरामर केल्या. चार वेळा उत्कृष्ट नायक म्हणून राष्ट्रीय पुरस्कार, १५ वेळा फिल्मफेअर तसेच पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण असे मानाचे पुरस्कार मिळाले आहेत. अभिनेता, निर्माता, गायक तसेच टीव्ही शोचा उत्तम निवेदक अशी प्रत्येक साच्यात उत्तम कामगिरी केली आहे. आगामी काळातही झुंड, ब्रम्हास्त्र, गुलाबो सिताबो, चेहरे हे चित्रपट येत आहेत. म्हणूनच अमिताभ म्हणजे 'अभिनयाचे विद्यापीठ' म्हटले तरी वावगे ठरणार नाही. चित्रपटसृष्टीच नव्हे तर सामाजिक भान राखणारा हा कलावंत, सर्वांना मार्गदर्शक तसेच वेळेचे भान पाळणारा असाच आहे. या वयातही तरुणांना लाजवेल असा उत्साही राहणे हा कौतुकाचाच विषय बनले आहेत. म्हणूनच म्हणावेसे वाटते, 'तू न थकेगा कभी...तू न रुकेगा कभी...तू न मुडेगा कभी...!!' अशा अभिनयाच्या विद्यापीठाला वाढदिवसाच्या मनापासून शुभेच्छा!!

**- संतोष राऊत, लोणंद, जि. सातारा.**

---

# मुल्हेरचा रासक्रीडा महोत्सव

मनोरंजन आणि संस्कृतीची जोपासना करण्याचा दावा करणाऱ्या कार्यक्रमातून ऑर्केस्ट्रा, डीजेसारख्या आधुनिक संगीत वाद्य पद्धतींची भुरळ तरुणाईला आकृष्ट करीत असताना दुसरीकडे हजारो वर्षांची परंपरा जोपासणारा बागलाण तालुक्यातील मुल्हेर येथील रासक्रीडा उत्सव नुकताच पार पडला. रासक्रीडेचा हा सोहळा संपूर्ण भारतात फक्त वृंदावन, मथुरा आणि मुल्हेर येथेच साजरा केला जातो. धार्मिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व तसेच पिढ्यान्‌पिढ्या अखंडपणे सुरू असलेला हा अद्वितीय सोहळा आजही तितक्याच श्रद्धेने व निष्ठेने साजरा केला जात आहे. कोजागरी पौर्णिमा आली म्हणजे भाविकांना वेध लागतात ते रासक्रीडा उत्सवाचे. राधाकृष्ण जय कुंज बिहारी, मुरलीधर गोवर्धन धारी हे भजन कानावर पडताच मुल्हेर येथे जमलेल्या हजारो भक्तांची मने उत्साहाने प्रफुल्लित होऊन जातात.

नाशिक जिल्ह्यातील सटाणा तालुका अर्थात बागलाण हा तसा पूर्वापार संपन्न परिसर. त्यातील मुल्हेर परिसरातून सह्याद्रीच्या उत्तर-दक्षिण पर्वतरांगेचा आरंभ होतो. मुल्हेर हे प्राचीन काळापासून धार्मिक आणि ऐतिहासिक असे महत्त्वाचे स्थान आहे. महाभारत काळातही मुल्हेरचे अस्तित्व असल्याचे सांगितले जाते. याशिवाय शिवकाळात मुल्हेरचा किल्ला हा अनेक ऐतिहासिक घडामोडींचे केंद्र होता. तर त्याच्याही आधीपासून म्हणजे चौदाव्या शतकापासूनच्या इतिहासात मुल्हेरची नोंद आहे. या परिसरावर तिसऱ्या शतकात अभिरांची राजवट होती. स्वत:ला कृष्ण परंपरेतील मानणाऱ्या अभिरांचे राधा हे कुलदैवत. त्यातूनच रासक्रीडा उत्सवाची सुरुवात इथे झाली असावी.



बागलाणमधील देवळाणे येथील प्राचीन मंदिरावर कोरलेल्या शिल्पांमध्येही रासचक्र दिसते. या चक्रात कृष्ण आणि गोपिका दिसतात. रासक्रीडेबाबत अन्यही आख्यायिका आहेत. प्राचीन काळी उत्तरेतून दक्षिणेत जाण्याचा मार्ग मुल्हेरवरून जात असल्याने साधू आणि ऋषींचा इथे वावर असे. मुल्हेर पर्वतावरून व्याध या ताऱ्याचे दर्शन घेण्यासाठी ते इथे मुक्काम करत, असा संदर्भ देऊन हा रासक्रीडा उत्सव पाच हजार वर्षांपासून सुरू असल्याचे सांगितले जाते. प्रत्यक्षात सातशे वर्षांपासून रासक्रीडा उत्सव होत असल्याचे पुरावे उपलब्ध आहेत. या उत्सवाला महाराष्ट्राप्रमाणे गुजरात, मध्य प्रदेश व उत्तर प्रदेशातूनही जवळपास पन्नास हजारांहून अधिक भाविक कोजागिरीच्या रात्री उपस्थित असतात. त्यामुळे मुल्हेरला यात्रेचे स्वरूप येते. या उत्सवात नवस बोलण्यासाठी आणि पूर्ण करण्यासाठीही गर्दी असते. त्यात अपत्यप्राप्तीसाठी नवस बोलणारे अधिक असतात. नवस हा श्रद्धेचा भाग असला तरी हा रासक्रीडा उत्सव म्हणजे एक सांस्कृतिक सोहळा आहे यात शंका नाही. **- दिलीप कोठावडे.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# मशालीचे पूजन करुन गद्दारांना धडा शिकवणार : बरडे
# शिवसेनेचे मालक बाळासाहेबच हे मुख्यमंत्र्यांनी दाखवले : काळजे

✔ सुराज्य/सोलापूर

धनुष्यबाणापूर्वी मशाल हेच शिवसेनेचे चिन्ह होते. मशालीनेच सेनेला पहिला खासदार दिला होता. त्यामुळे मशाल चिन्ह आमच्यासाठी भाग्यशाली आहे. म्हणून मंगळवारी सकाळी तमाम शिवसैनिकांच्या उपस्थितीत मशाल पूजन केले जाणार आहे, अशी माहिती ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख पुरूषोत्तम बरडे यांनी दिले. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बाळासाहेबांची शिवसेना हे नाव घेऊन खऱ्या अर्थाने शिवसेनेचे मालक बाळासाहेब ठाकरे व सर्वसामान्य शिवसैनिक आहेत हेच संपूर्ण देशाला ठणकावून सांगितले आह, असे शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख मनिष काळजे यांनी म्हटले आहे.



निवडणूक आयोगाने सोमवारी उद्धव बाळासाहेब शिवसेनेला मशाल चिन्ह दिले तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बाळासाहेबांची शिवसेना हे नाव दिले. त्यावर दोन्ही गटाच्या जिल्हाप्रमुखांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. बरडे म्हणाले की, मोरेश्वर सावे हे शिवसेनेचे प्रथम खासदार मशाल चिन्हावरच निवडून आले. त्यामुळे हे चिन्ह आम्हाला भाग्याचे आहे. त्यामुळे याचे पूजन करून आम्ही नव्या लढ्याला प्रारंभ करून गद्दारांना धडा शिकवणार आहोत.

तर मनिष काळजे म्हणाले की, मुख्यमंत्र्यांनी बाळासाहेबांची शिवसेना हे नाव घेऊन शिवसेनेचे मालक बाळासाहेब ठाकरे व सर्वसामान्य शिवसैनिक आहेत हेच सांगितले आहे. मात्र दुसऱ्या बाजूला उद्धव ठाकरे यांनी आपल्या उरल्या सुरल्या राहिलेल्या शिवसेनेला नाव देताना सुद्धा त्यात स्वतःचे उद्धव हे नाव वापरून आपण स्वतः किती स्वार्थी आहोत हे आपल्या कृतीतून दाखवून दिल्याचे म्हटले.



## जिजामाता कन्या प्रशालेत ७०० आकाशकंदीलाची निर्मिती

✔ **सुराज्य/अकलूज** : शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजच्या जिजामाता कन्या प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता पाचवी ते आठवी मधील विद्यार्थिनींनी शाळेमध्ये स्वतः ७०० आकाशकंदील बनवून नवनिर्मितीचा आनंद लुटला. उठा-उठा दिवाळी आली आकाशकंदील बनविण्याची वेळ झाली असे म्हणत मुख्याध्यापक कल्लाप्पा सुर्यवंशी व पर्यवेक्षक यशवंत माने-देशमुख यांच्या आवाहनाला साद देत मुलींनी घोटीव कागद, एम. एस. पेपर, कार्डशीट, जिलेटीन पेपर, रंगीबेरंगी मणी व टिकल्या यांचा वापर करून आकर्षक वेगवेगळ्या आकाराचे आकाशकंदील बनविले. यावेळी रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील गृहविज्ञान महिला महाविद्यालयाच्या प्राध्यापिका राजश्री निंभोरकर व कला विभाग प्रमुख माधुरी भांगे यांनी मुलींना मार्गदर्शन केले. यावेळी प्रशालेतील सर्व शिक्षक-शिक्षिका उपस्थित होत्या.

## कृषी विभागाच्यावतीने सुधारीत रब्बी ज्वारी बियाण्याचे वाटप

✔ **सुराज्य/चिखली** : मोहोळ तालुक्यातील मौजे मुंढेवाडी परिसरातील शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान योजनेअंतर्गत कृषी विभागाच्या वतीने सुधारीत रब्बी ज्वारी बियाण्याचे वाटप करण्यात आले. बाळाला आवश्यकता लसींची. तशी बियाण्याला आवश्यकता बीज प्रक्रियेची या म्हणीप्रमाणे ज्वारीला जैविक व रासायनिक बीज प्रक्रिया विषय सविस्तर मार्गदर्शन करून ज्वारीला बीज प्रक्रिया करूनच कृषी विभागाच्या वतीने बियाणाचे वाटप करण्यात येत आहे. बीज प्रक्रिया करण्याचे फायदे ऐकून उपस्थित शेतकरी वर्गामध्ये बीज प्रक्रिया केल्याशिवाय बियाणे पेरणी खरंच करू नये असे वातावरण निर्माण झाले. आजतागायत कधीही या भागातील शेतकऱ्यांना बियाणाविषयी माहिती अथवा बियाणाचे वाटप देखील कधी झाले नाही. ते यावर्षी रब्बी हंगामात कृषी विभागामार्फत मोफत माहिती आणि मोफत बियाणे मिळाल्याने शेतकरी वर्गातही आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्याच बरोबर कृषी सहायक वैशाली माळी यांनी मागेल त्याला घरोघरी वाड्यावस्त्यावर प्रत्यक्ष जाऊन बीजप्रक्रिया. तसेच दोन्ही रोपांतील अंतर तसेच दोन ओळींतील अंतर. माती परीक्षण नुसार खताचा वापर इत्यादी तंत्रज्ञान सांगून बीज प्रक्रिया करूनच बियाणे वाटप करीत आहेत. त्यामुळे मुंढेवाडी परिसरातील शेतकऱ्यांनी कृषी सहायक वैशाली माळी यांचे कौतुक केले आहे यावेळी उपसरपंच राहुल व्यवहारे. केराप्पा व्यवहारे. अभिमान व्यवहारे. नागेश व्यवहारे. माजी सरपंच भीमराव व्यवहारे. देवीदास पाटील. प्रकाश व्यवहारे. सुनील व्यवहारे. अशोक जाधव. महादेव वाघमारे आदी शेतकरी उपस्थित होते.



## सोलापुरातील हिंदवी परिवाराने अनुभवला आग्र्यातून सुटकेचा थरार

✔ **सुराज्य/सोलापूर** : हिंदवी परिवाराच्यावतीने 'शिवप्रताप गरुडझेप' या चित्रपटाच्या विशेष शोचे आयोजन सोलापुरातील उमा भागवत चित्रमंदिर येथे करण्यात आले होते. याप्रसंगी खा. डॉ. अमोल कोल्हे यांनी प्रेक्षकांशी व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून संवाद साधला. हिंदवी परिवाराचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवरत्न शेटे यांच्या आवाहनाला हिंदवी परिवारातील सदस्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन सहकुटुंब हा चित्रपट बघण्यासाठी उपस्थित राहिला.

## 'सोंग' चित्रपटाचा मुहूर्त

✔ **सुराज्य/सोलापूर** : के.सी.एस प्रोडक्शन निर्मित असाच एक वेगळ्या धाटणीचा मराठी चित्रपट 'सोंग' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. क्षितिज सी. शिंदे निर्मित आणि संजय कसबेकर लिखित-दिग्दर्शित 'सोंग' चित्रपटाचा मुहूर्त नुकताच कलाकार, तंत्रज्ञ आणि असंख्य मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. भटक्या विमुक्त जमातीमधील एका सामान्य कुटुंबावर हा चित्रपट आधारलेला आहे. लेखक-दिग्दर्शक संजय कसबेकर यांनी या चित्रपटाची कथा लिहिली आहे. या चित्रपटात मिलिंद शिंदे, नागेश भोसले, विकास समुद्रे, वीणा जामकर, पूर्णिमा अहिरे यांसारख्या अनुभवी कलाकारांसह विनोद दोंदे व प्रतिभा शिंपी आदींच्या भूमिका आपल्याला पहायला मिळणार आहेत. छायाचित्रणाची जबाबदारी संतोष बोराटे आणि संदीप साळुंखे यांनी सांभाळली आहे तर कार्यकारी निर्माते जितू शिंदे आहेत. 'सोंग' चित्रपटाच्या चित्रीकरणाला लवकरच सुरुवात होणार आहे.



## लंपी संसर्गातून जिल्हा मुक्त करा : जनआंदोलक संघटनेची मागणी

✔ **सुराज्य/सोलापूर** : जिल्ह्यातील सर्व जनावरांना लंपीवर लसीकरण करुन हा जिल्हा लंपी संसर्गातून मुक्त करावा, अशी मागणी भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन या संघटनेने केली आहे. याबाबतचे निवेदन संघटनेने जिल्हा पशुसंवर्धन विभागाला दिले आहे. लंपी लसीकरणाला गती द्यावी, मृत्युमुखी पडलेल्या जनावरांचा सर्व्हे करुन त्यांना विमा कंपन्यांच्या धोरणानुसार मदत द्यावी आदी मागण्या त्यात करण्यात आल्या आहेत. याप्रसंगी संघटनेचे जिल्हाध्यक्ष किरण शिंदे, उपाध्यक्ष मारुती लोंढे, मारुती क्षीरसागर, विनायक निंबाळकर, बिभिषण धुमाळ, पांडुरंग शिंदे उपस्थित होते.

## सुताच्या गाठीच्या कारखान्याला लागली आग

✔ **सुराज्य/सोलापूर** : एमआयडीसी अक्कलकोट रोडवरील गोवर्धन कंदीकटला यांच्या सुताच्या गाठीच्या कारखान्यास सोमवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास आग लागली.



त्यावेळी अग्निशामक दलाकडून तात्काळ कार्यवाही करून पाच पाण्याच्या गाड्या बोलावून संपूर्ण आग त्वरित विजवण्यात आली.या आगीमध्ये कोणत्याही प्रकारची जीवित हानी झालेली नाही.मात्र आगीमध्ये पहिल्या मजल्यावर रंगणी केलेले तयार सूतबांबू इत्यादी जळाले आहेत.

## सोलापुरात १६ रोजी राज्यस्तरीय वकील परिषद

### सरन्यायाधिश उदय लळीत यांचा होणार सत्कार

✔ सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिल व सोलापूर बार असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने १६ ऑक्टोबर २०२२ रोजी सोलापूरातील हुतात्मा स्मृती मंदिरात राज्यस्तरीय वकिल परिषदेचे आयोजन करण्यात आले असून,या वकिल परिषदेचे उदघाटन भारताचे सरन्यायाधीश उदय लळीत हे करणार असून यावेळी त्यांच्या भव्य सत्कार होणार असल्याची माहित महाराष्ट्र गोवा बार कौन्सिलचे अध्यक्ष ॲड. मिलिंद थोबडे यांनी दिली.

सोलापूरच्या सुपुत्राची भारताच्या सरन्यायाधीश पदी झालेली निवड ही तमाम सोलापूरकरांच्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे. तसेच भारताचे सरन्यायाधिश सोलापूरात उपस्थित राहण्याची पहिलीच वेळ असल्याचेही ॲड मिलिंद थोबडे यांनी सांगितले.



कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रामध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमुर्ती दिपंकर दत्ता यांचेसह उच्च न्यायालयातील न्यायमुर्ती पी.के.चव्हाण,न्यायमूर्ती विनय जोशी,न्यायमूर्ती एन.जे.जमादार,बार कौन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष मननकुमार मिश्रा,महाराष्ट्राचे महाधिवक्ता आशुतोष कुंभकोणी व सोलापूर जिल्हयाचे प्रमुख जिल्हा न्यायाधिश डॉ.शब्बीर अहमद औटी यांचे उपस्थितीत भारताचे सरन्यायाधिश उदय ललित यांचा भव्य सत्कार होणार आहे.

दुसऱ्या सत्रात कर्नाटक उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमुर्ती म्हणून नुकतीच नियुक्ती झालेले न्यायमुर्ती पी.बी.वराळे व उच्च न्यायालयाचे न्या.एम. एस.कर्णिक यांचे अध्यक्षतेखाली ॲड.युवराज नरवणकर (कोल्हापूर) व ॲड.अरविंद आव्हाड (पुणे) यांचे युवा बार व न्यायपित यांचा विकास या वकिल परिषदेच्या मुख्य विषयावर मार्गदर्शन होणार आहे.तसेच बार कौन्सिलतर्फे जेष्ठ विधिज्ञ पुरस्काराचे वितरण होणार आहे.तिसऱ्या सत्रात बार कौन्सिलचे सर्व सदस्य,भारताचे अतिरिक्त महाधिवक्ता अनिल सिंग व जिल्हा सरकारी वकील प्रदिपसिंग रजपूत यांचे उपस्थितीत नामांकित विशेष सरकारी वकील उज्वल निकम हे विविध कायदे विषयक मुद्यावर मार्गदर्शन करणार आहेत. राज्यातील सर्व वकिलानी उपस्थितीत रहावे असे आवाहन बारकान्सिलचे अध्यक्ष ॲड.मिलिंद थोबडे व सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.निलेश ठोकडे यांनी केले आहे.

## भाविकांचे चोरलेले १७ मोबाईल जप्त

### दोन अट्टल चोरट्यांना अटक

### फौजदार चावडी डी.बी. पथकाची कामगिरी

✔ सुराज्य/सोलापूर

तुळजापूर येथे देवदर्शन करिता जाणाऱ्या भाविकांच्या गर्दीचा फायदा घेवुन सोलापूर शहर व जिल्हा तसेच आजुबाजुचे परिसरात मोबाईल चोरी करणाऱ्या दोन अट्टल चोरट्यांना अटक करून त्यांच्याकडुन गुन्हयातील १७ मोबाईल असे एकुण २ लाख १हजार २०० रुपये किंमतीचा मुददेमाल फौजदार चावडी पोलीस ठाण्यातील गुन्हे शाखेच्या पथकाने हस्तगत केला.

फिर्यादी बार्शी येथील सेवानिवृत्त कर्मचारी बाळासाहेब अनंतराव देशपांडे हे दि.९ ऑक्टोबर रोजी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास सोलापूर एस.टी.स्टॅन्ड येथे बार्शीला जाणारे एस.टी.मध्ये चढत असताना पाठीमागुन अचानक एका अनोळखी इसमाने खिशातील मोबाईल हिसकावून घेवून पळुन गेला. फिर्यादीने आरडा ओरडा केला परंतु तो गर्दीत घुसून पळून गेला.फौजदार चावडी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

आरोपींकडे एकुण १७ मोबाईल मिळुन आले. या मोबाईलची तपासणी केली असता ते मोबाईल वेगवेगळया ठिकाणाहून चोरी केलेले असल्याचे सांगीतले. आनंद अंबादास मंजेली (वय-३२,धंदा-मजुरी रा.जुना अक्कलकोट नाका,शनि मंदिरा समोरील झोपडपट्टी,अक्कलकोट रोड,सोलापूर) व अंबादास भगवान शिंदे (वय-३२,रा. जोशी गल्ली,भोलाभाई चौकाजवळ, रविवार पेठ,सोलापूर) असे या सराईत चोरट्यांची नावे आहेत.



## किसान क्रेडीट कार्डसाठी मोहीम

✔ **सुराज्य/सोलापूर** : जिल्हयातील पंतप्रधान सन्मान निधी योजनेच्या लाभार्थ्यांना किसान क्रेडिट कार्ड देण्यासाठी गुरुवार, १३ रोजी गावोगावी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाळासाहेब शिंदे यांनी दिली.

ही मोहीम यशस्वी करण्यासाठी तालुका कृषी अधिकाऱ्यांनी प्रलंबित किसान केडीट कार्डधारक शेतकऱ्यांची गावनिहाय यादी तयार करून ती कृषी सहायकाकडे द्यायची आहे. तसेच शेतकऱ्यांकडून माहिती भरून घेण्यासाठी विहित नमुन्यातील एक पानी अर्जाच्या प्रती तयार करून घ्याव्यात. हे अर्ज कृषी सहायकांनी शेतकऱ्यांकडून भरून घ्यायचे आहेत. शेतकऱ्यांचे भरून घेतलेले अर्ज संबंधित दत्तक बँकेत जमा करून त्याची पोहोच घ्यावयाची आहे. या मोहिमेत शेतकरी गट, कृषी मित्र, कृषी उत्पादक कंपन्या, सरपंच व पदाधिकाऱ्यांना सहभागी करून घ्यावे, अशी सूचना शिंदे यांनी दिली आहे.

## 'विठ्ठलराव'च्या युनिट नं १ व २ च्या गळीत हंगामाचा आज प्रारंभ

✔ **सुराज्य/टेंभुर्णी** : विठ्ठलराव शिंदे सरकारी साखर कारखाना युनिट नंबर १पिंपळनेर येथील सन २०२२-२३ चा २२ वा ऊस गळीत हंगामाचा प्रारंभ मंगळवार ( ता.११) रोजी सकाळी ११.वा. साखर आयुक्त शेखर गायकवाड यांच्या हस्ते व ह.भ.प. जयवंत प्रभाकर बोधले महाराज यांच्या अध्यक्षतेखाली तसेच विठ्ठल कार्पोरेशनचे संस्थापक अध्यक्ष आ. संजयमामा शिंदे उपविभागीय अधिकारी ज्योती कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याची माहिती विठ्ठलराव शिंदे साखर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष आमदार बबनराव शिंदे यांनी दिली.

यावेळी कार्यकारी संचालक एस.एन. डिग्रजे, युनिट नंबर २ चे जनरल मॅनेजर एस. आर. यादव, वर्क्स मॅनेजरए.डी.ढेकाने, जनरल मॅनेजर प्रोसेस पी.एस.येलपले, डिस्टीलरी मॅनेजर पी.व्ही. बागल, केन मॅनेजर एस.पी.थिटे, फायनान्स मॅनेजर डी.डी.लव्हटे, मुख्य शेतकी अधिकारी एस.एस. बंडगर,चिफ इंजिनिअर एस. एस. महामुनी, चिफ केमिस्ट बी.जे. साळुंके, शेतकी अधिकारी बी.डी.इंगवले, परचेस ऑफिसर जे.डी. देवडकर, सिव्हील इंजि. एस.आर. शिंदे आदी उपस्थित होते.

## पोक्सोच्या आरोपातून तरुण निर्दोष

✔ **सुराज्य/सोलापूर** :

कॉलेजमध्ये जाणाऱ्या एका अल्पवयीन तरुणीचा पाठलाग करून तिच्याशी असभ्य वर्तन केल्याच्या आरोपातून अलीम लतीफ पठाण(रा.सोलापुर) याला गुन्हा शाबित न झाल्याने निर्दोष मुक्त करण्याचा आदेश जिल्हा सत्रन्यायाधीश व्ही.पी.आव्हाड नुकताच दिला.

यातील आरोपी हा पिडीतेचा पाठलाग करीत रस्त्यावर अडवून मनास लज्जा वाटेल असे कृत्य केल्याप्रकरणी फौजदार चावडीच्या पोलिसांनी अलीम पठाण याच्या विरुद्ध २४ जुलै२०१८ रोजी कलम ३५४(अ)(ड) ,३४१ सह बाललैंगिक अत्याचारापासून बालकांचेसंरक्षणअधिनियमाप्रमाणे गुन्हा दाखल करून आरोपपत्र न्यायालयात दाखल केले होते.

या खटल्यात सरकार पक्षातर्फे ६ साक्षीदार तपासण्यात आले. या प्रकरणात ड.निलेश जोशी यांनी सरकार पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या साक्षीमध्ये अनेक तफावती असल्याचे तसेच तक्रारदारांच्या कुटुंबात व आरोपी यांच्यातील वैयक्तिक वादाचा बदला घेण्यासाठी काल्पनिक आणि खोटी फिर्याद दिल्याचा युक्तीवाद मांडला होता. या खटल्यात आरोपीच्या वतीने ड. निलेश जोशी,ड.यशश्री जोशी,ड. मल्लिनाथ बिराजदार,ड.पैगंबर सय्यद, ड.राणी गाजूल आणि ड. ओंकार परदेशी यांनी काम पाहिले.

PRADNYA NIKETAN EDUCATION SOCIETY, PUNE'S
N. K. ORCHID COLLEGE OF ENGG. & TECH., SOLAPUR.
NAAC Accredited Institute
Gut No. 16, Solapur-Tuljapur Road, Tale Hipparaga, Solapur-2. Phone No. : 9423084363, Website : www.orchidengg.ac.in, E-mail : office@orchidengg.ac.in
Approved by AICTE, Govt. of Maha. & Affiliated to DBATU University, Lonere.
OUR NUMBERS SPEAK...



Wipro 106 selected
Persistant 22 selected
TCS 47 selected
TIAA 15 selected
470 PLACEMENTS-2022
Rigorous Preparations for Placements
Average Pkg. 4.5LPA
Highest Pkg. 10.48LPA
50 Students Qualified MPSC/ UPSC till now
Make your CAREER with the Brand ORCHID EN6223
58 Students selected for MS at UK, USA, Germany etc.
14 Students Awarded with Research Patent
Special Coaching for GATE, GRE, TOEFL & IELTS

Various B.Tech & M.Tech. Courses

| COURSE | INTAKE | GENERAL CHOICE CODE |
|---|---|---|
| B.Tech.- Artificial Intelligence & Data Science | 60 | 622399510 |
| B.Tech.- Civil Engg. | 120 | 622319110 |
| B.Tech.- Computer Sci. & Engg. | 120 | 622324210 |
| B.Tech.- Electronics & Tele. Comm. Engg. | 60 | 622337210 |
| B.Tech.- Electrical Engg. | 60 | 622329310 |
| B.Tech.- Mechanical Engg. | 120 | 622361210 |
| M.Tech.- Civil- Computer Aided Structural Analysis & Design Engg. | 12 | 622393810 |
| M.Tech.- Mech.- Thermal Engg. | 06 | 622361010 |

ऑर्किड एज्युकेशन मॉडेल
Skill Based Education: परीक्षार्थी न राहता खऱ्या अर्थाने विद्यार्थी म्हणून जडण घडण.
Industry Oriented Addon Courses.
संभाषण कौशल्य विकासासाठी Soft skills विषयाचे वेळापत्रकात समावेश.
इंडस्ट्रीयल ट्रेनिंगवर विशेष भर.
कॅम्पस प्लेसमेंटसाठी Aptitude, Mock Interview, Mock GD
Honors & Minor Degree
VIII[th] Semester - Internship
Immediate Re-exam. within 15 days



ORCHID
The Place for Real Placements
contact
Prof. Santosh Jadhav 9552529255 (FY B.Tech)
Prof. A H Kangale 9552559259
Mr.Suhas Shelke 9552529291 (Registrar)
grafitech art



## संघाच्या जागतिक युवा परिषदेसाठी वेळापूरचे तुषार पवार आमंत्रित

**वेळापूर** : भारतातली व्यवस्थेच्या बळी ठरलेल्या पारधी जातीतील युवकाची संयुक्त राष्ट्र संघाने दखल घेतली असुन वेळापूर चव्हाणवाडी तालुका माळशिरस येथील तुषार पवार याची ४ ते ७ नोव्हेंबर २०२२ दरम्यान , संयुक्त राष्ट्र संघ, यांच्यावतीने बँक कॉक थायलंड येथे आयोजित केलेल्या,जागतिक युवा परिषदे साठी तुषार पवारला अमंत्रित करण्यात आले आहे. त्याबदल बहुजन मुक्ति पार्टीच्या वतीने राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य काकासाहेब जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी महेंद्र साठे, पत्रकार अमोल साठे उपस्थित होते.

## सहकार भारतीच्या वतीने मंगळवारी डॉ.सचिन लादे यांचे व्याख्यान

**सुराज्य/बार्शी** : बार्शी तालुका सहकार भारती शाखेच्या वतीने मंगळवार दि.११ ऑक्टोंबर रोजी मातृमंदिर ढगे मळा येथे सायंकाळी ६.३० वाजता तज्ञ वक्ते डॉ.सचिन लादे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले असल्याची माहिती तालुकाध्यक्ष अमित इंगोले यांनी दिली आहे. या व्याख्यानाचे अध्यक्षस्थान जेष्ठ पत्रकार राजा माने भुषविणार असून यावेळी सहकारी भारतीचे जिल्हाध्यक्ष दामोदर देशमुख, जिल्हा महामंत्री शिवानंद बोरामणी, जिल्हा कार्यकारिणी सदस्य मुरलीधर चव्हाण, बार्शी शहर पालक नंदकुमार होनराव आदी उपस्थित राहणार आहेत. यावेळी सचिव विजय शिखरे, शहर पालक मिलिंद कांबळे, प्रकाश फुरडे व सदस्य अजिंक्य बुड्रख, स्वप्निल सावळगी, श्रीमती कुसूम देवकर, विनोद पवार, मंगेश बारंगुळे, समाधान पाटील, अतुल सोनिग्रा, विनोद बुड्रख, रामचंद्र गौरकर, सुषम बंडेवार, भरत परमार, सागर जहागिरदार, गणेश शिंदे, दत्तप्रसाद पाटील, डॉ. सुबोध केसकर, सूर्यकांत वायकर यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार होणार आहे.

## तुळजापूरला जाणाऱ्या भाविकांना बार्शीतल्या स्वयंमसेवी संघटनांची सेवा

**सुराज्य/बार्शी** : राज्याचे आराध्य दैवत असलेल्या तुळजापूर येथील तुळजाभवानी देवीच्या दर्शनाला जाणाऱ्या भाविकांना विविध माध्यमातून सेवा देण्याचे काम बार्शीतील स्वयंमसेवी संघटनांनी केले. रविवारी बार्शी तुळजापूर मार्गावर मदत कार्याचे स्टॉल्स उभारण्यात आले होते. श्री प्रसन्नदाता गणेश मंदिर ट्रस्ट व सुशिल-शितल फौंडेशन आणि जय शिवराय प्रतिष्ठाण या संघटनांनी कमलेश मेहता, बंडू माने यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच विजय राऊत, संकेत वाणी यांच्या नेतृत्वाखाली भाविकांना प्राथमिक उपचार व इतर औषधोपचार देण्याचे काम केले. न्यु तरूण गणेश मंडळाचे अध्यक्ष व व्यापारी महेश यादव यांनी भाविकांना अंघोळीच्या गरम पाण्याची व प्रसाधन गृहाची सोय उपलब्ध करून दिली होती. माजी उपनगराध्यक्ष राजाभाउ रसाळ मित्र मंडळाने भाविकांना अल्पोउपहाराची सोय करून दिले. जव्हेरी मित्र मंडळ व लखन रजपूत मित्र मंडळाने चहा व जेवणाची सोय केली होती. बार्शी प्रिंटींग असोशिएशनने चहाची सोय केली होती. माजी नगरसेवक रोहित व प्रेम लाकाळ बंधुनी भाविकांना अल्पोउपहाराची सोय केली होती. शहरातील विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते मनापासून या सेवा कार्यात सहभागी झाले होते.

# महाराष्ट्र स्टार्टअप यात्रेच्या जिल्हास्तरीय सादरीकरण सत्राचे गुरुवारी आयोजन

**सुराज्य/सोलापूर**

### जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांची माहिती



जिल्ह्यातील नागरिकांच्या नवसंकल्पनांना मूर्त स्वरुप देण्यासाठी आणि राज्यातील नाविन्यपूर्ण परिसंस्था बळकट करण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत महाराष्ट्रात तालुकास्तरीय स्टार्टअप यात्रेचा प्रचार व प्रबोधनाचा पहिला टप्पा यशस्वीरीत्या पार पडला. यात्रेचा दुसरा टप्पा, जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबीर व सादरीकरण सत्र १३ ऑक्टोबर रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, इन्क्युबेशन सेंटर, सोलापूर येथे आयोजित केल्याची माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दिली

स्टार्टअप यात्रेसाठी वयाची अट नसल्याने जिल्ह्यातील जास्तीत नवसंकल्पना असणाऱ्या शाळा, महाविद्यालये व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील विद्यार्थी तसेच नवउद्योजक उमेदवार, स्टार्टअप्स, उद्योजक, नाविन्यता परिसंस्थांना जिल्हास्तरीय नाविन्यपूर्ण संकल्पनाबाबतच्या सादरीकरणामध्ये सहभागी होता येईल. यासाठी गुरुवार १३ ऑक्टोबर रोजी थेट नोंदणी करण्याची संधी सादरीकरणाच्या ठिकाणी सकाळी १०.३० वाजेपर्यंत उपलब्ध करुन दिली आहे, जास्तीत जास्त नवउद्योजक, नवसंकल्पना मांडणाऱ्यांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन . शंभरकर यांनी केले आहे.

पहिल्या सत्रामध्ये सकाळी ९.३० ते ११.१५ वाजता विभागाच्या विविध योजनांची माहिती, स्टार्टअपच्या प्रवासातील टप्पे याबाबत मार्गदर्शन व स्थानिक उद्योजकांची व्याख्याने आयोजित करण्यात येणार आहेत. दुसऱ्या सत्रात सकाळी ११.३० वाजेपासून सादरीकरण्याची संधी देण्यात येईल. प्रत्येक नवसंकल्पनेस १० मिनिटे सादरीकरणाची संधी मिळेल. यामध्ये पाच मिनिटे सादरीकरण आणि पाच मिनिटे प्रश्नोत्तराची असतील. जिल्हास्तरीय विजेत्यांची निवड कौशल्य, रोजगार व उद्योजकता नाविन्यता जिल्हा कार्यकारी समितीद्वारे केली जाईल. जिल्हास्तरावर उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या तीन उमेदवारांना प्रथम २५ हजार, द्वितीय १५ हजार व तृतीय १० हजार रूपये याप्रमाणे पारितोषिक दिले जाणार आहे.

अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थ कोट, पार्क चौक, सोलापूर येथे प्रत्यक्ष भेटीद्वारे अथवा कार्यालयाच्या ०२१७-२९५०९५६ या दूरध्वनीद्वारे अथवा सादरीकरण समन्वयक श्रीनिवास पाटील (७०८०२०२०५५, ७०८०२०२०५६), दत्तात्रय देवळे (८८०५४६२०१२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन कौशल्य विकासचे सहायक आयुक्त सचिन जाधव यांनी केले आहे.

## पनाश टॉवर : गॅलोर डेव्हलपर्स कंपनीची उच्च न्यायालयात धाव

**सुराज्य/सोलापूर** : विजापूर रोडवरील बहुचर्चित पनाश टॉवर येथील १६३२ चौरस मीटर जागा कंपनीने महापालिकेला द्यावी तसेच गॅलोर डेव्हलपर्स कंपनीने रिविजन करावे असे आदेश महापालिका आयुक्तांनी दिले होते. दरम्यान, याप्रकरणी गॅलोर डेव्हलपर्स कंपनीने उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. न्यायालयात मंगळवारी या संदर्भात सुनावणी होणार आहे.

पनाश टॉवर प्रकरणी पुणे येथील गॅलोर कंपनीला यापूर्वी दिलेल्या नोटीसीच्या खुलाशावर सोलापूर महापालिका प्रशासनाने राज्य शासनाचे मार्गदर्शन मागविले आहे. दरम्यान, आता या टॉवर मधील नेमकी किती जागा कंपनीने महापालिकेला द्यावयाची आहे. याचा निर्णय घेण्यासाठी गॅलोर कंपनीने नव्याने रिविजन करून घ्यावे त्यासाठी महापालिकेला कंपनीने अर्ज करावा असे आदेश महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी दिले. येत्या दहा दिवसात या कंपनीने हे रिविजन करावयाचे आहे. जर कंपनीकडून तसे नाही झाल्यास महापालिकेकडून रिविजन करण्यात येईल, असे आदेश महापालिका आयुक्तांनी दिले होते.

एकूण १७ मजलीची ही नियोजित इमारत आहे. त्याप्रमाणे महापालिकेला १६३२ चौरस मीटर जागा कंपनीने द्यावयाची आहे मात्र आतापर्यंत कंपनीने केवळ ४९६ चौरस मीटर जागाच पालिकेला दिली आहे. त्याचबरोबर एफएसआय संदर्भातही मार्गदर्शन मागविण्यात आले आहे.

# तालुक्यातील ९२ टक्के गोवंशीय पशुधनाचे लम्पी त्वचारोग प्रतिबंधक लसीकरण पूर्ण

**सुराज्य/पंढरपूर**



लम्पी त्वचारोगाचा प्रादुर्भाव आटोक्यात आणण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत लम्पी त्वचा रोग प्रतिबंधक लसीकरण मोहीम वेगाने राबविण्यात येत आहे. पंढरपूर तालुक्यात गोवंशीय जनावरांची संख्या सुमारे ८९ हजार इतकी असून, आतापर्यत ८२ हजार ६७१ गोवंशीय जनावरांचे लसीकरण पुर्ण झाले असल्याचे पशुसंवर्धन सह. आयुक्त डॉ.एस.एस. भिंगारे यांनी सांगितले.

पंढरपूर तालुक्यात ९२ टक्के गोवंशीय पशुधनाचे लसीकरण पुर्ण झाले असून, लसीकरण राहिलेल्या पशुधनाचेही वेगाने लसीकरण सुरु आहे. तालुक्यात आतापर्यत २८ जनावरे लम्पी त्वचा रोगाने बाधित झाली असून, त्यापैकी ८ जनावरे उपचारानंतर पुर्णपणे बरी झाली आहेत. १% जनावरांवर उपचार सुरु असून, ३ जनावरे मयत झाली आहेत. लम्पीने मृत झालेल्या एका जनावराच्या मालकाला ३० हजार रुपये मोबदला देण्यात आला आहे. तर उर्वरित २ जनावरांच्या मालकांना मोबदला देण्याबाबतची कार्यवाही सुरु असल्याची माहितीही पशुसंवर्धन सह. आयुक्त डॉ. भिगारे यांनी दिली. लम्पी त्वचा रोगाचा संसर्ग रोखण्यासाठी तालुका पशुसंवर्धन विभाग सज्ज असून, जनावरांच्या तत्काळ उपचारासाठी १० जलद प्रतिसाद पशुवैद्यकीय पथकाची नेमणूक करण्यात आली आहे.

तालुक्यातील १६ गावांमध्ये लम्पी आजाराची जनावरे आढळून आली आहेत. लम्पी त्वचारोगाची बाधा गोवंशीय पशुधनाला होत असून, पशुधन दगावण्याचे प्रमाण अत्यल्प आहे त्यामुळे पशुपालकांनी घाबरून न जाता काळजी घेऊन सतर्क राहण्याची आवश्यकता आहे.या पशुधनाचे वेगाने लसीकरण करण्यात येत असून लसीकरणाबाबत पशुपालकांनी व शेतकऱ्यांनी सहकार्य करावे असे आवाहन तालुका पशुसंवर्धन अधिकारी डॉ.प्रियंका जाधव यांनी केले आहे.

## राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेसाठी मंद्रुपच्या तीन खेळाडूंची निवड

**दक्षिण सोलापूर** : अर्धनारी नटेश्वर वेळापूर तसेच सोलापूर जिल्हा म्युचर खो - खो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने वेळापूर येथे झालेल्या किशोर किशोरी गटातील जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेत मुलांच्या संघात अर्धनारी नटेश्वर वेळापूर या संघास विजेतेपद तर न्यु गोल्डन स्पोर्ट्स क्लब मंद्रूप हा संघ उपविजेतेपद मिळवले होते.





१६ ऑक्टोबर ते १९ रोजी रत्नागिरी येथे होणाऱ्या किशोर संघात न्यु गोल्डन स्पोर्ट्स क्लब या संघातील मो. माज महिबुब पठाण, विशाल भुजंग जाधव, अरिफ जमीर शेख या तीन खेळाडूंची निवड झाली. हे विद्यार्थी महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील खेळाडू असुन गेली दोन वर्षे कोरोनामुळे खो खो सामने झाले नाहीत. पहिल्याच वर्षी सहभाग होऊन तिघांची निवड झाल्याबद्दल दक्षिण सोलापूर तालुक्यातून निवड झाल्याबद्दल मंद्रुपचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र मांजरे, उपनिरीक्षक अमितकुमार करपे, न्यु गोल्डन स्पोर्ट्स क्लबचे अध्यक्ष इब्राहिम शेख, उपाध्यक्ष प्राध्यापक डॉक्टर शिवानंद तोरवी, सचिव बबलु शेख, प्रशिक्षक महमद नदाफ, प्रशिक्षक फयाज बागवान आदिंनी अभिनंदन केले.

न्यु गोल्डन स्पोर्ट्स क्लबच्या तीन खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेत निवड झाल्याबद्दल मंद्रुप व तालुक्यातून अभिनंदन होत आहे.



## मंगेश चिवटे यांच्या हस्ते फोंडशिरस येथे शिवसेना शाखेचे उद्घाटन

**सुराज्य/नातेपुते**

फोंडशिरस तालुका माळशिरस येथे शिंदे गटाच्या शिवसेने शाखेचे उद्घाटन मुख्यमंत्री कार्यालयाचे आरोग्य विभागाचे प्रमुख मंगेश चिवटे यांच्या हस्ते घेण्यात आले.

यावेळी सोलापूर जिल्ह्याचे उपप्रमुख संतोष आबा वाघमोडे पाटील, माळशिरसचे नगरसेवक जगन्नाथ गेजगे, जिल्ह्याचे सहसंपर्कप्रमुख महेश साठे, तालुका शिवसेनेचे प्रमुख राजकुमार हिवरकर पाटील, नातेपुते शहराध्यक्ष समीर शेख, तालुकाप्रमुख तथा जिल्हा परिषद गटप्रमुख फोंडशिरस सरपंच पोपट बोराटे उपतालुकाप्रमुख सतीश सपकाळ उपस्थित होते. यावेळी तालुका कृषी समितीचे सदस्य सतीश बरडकर, भाजपचे नेते मनोज जाधव , शाखाप्रमुख संतोष मोरे, शिवसेना शहरप्रमुख समीर शेख दादाभाई मुलांनी, जावेद शेख, सतीश सपकाळ, सरपंच पोपटराव बोराटे, शहरप्रमुख संतोष गोरे तसेच शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

## मुस्तफाची कॅम्पस प्लेसमेंटमधून निवड

**सुराज्य/मोहोळ**

केगाव (सोलापूर) येथील एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातील कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागात पदव्युत्तर शिक्षण घेतलेला मुस्तफा शेखची कॅम्पस प्लेसमेंटमधून निवड झाली असून त्याला कंपनीकडून वार्षिक १३. ५ लाखांचे पॅकेज मिळाले आहे.

या यशाबद्दल सिंहगड संस्थेचे सहसचिव संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. रवींद्र व्यवहारे व डॉ. शेखर जगदे, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. विकास मराठे व तसेच शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



## सुरेखा कल्याणशेट्टी विद्यालयाची उद्योग क्षेत्रास अभ्यास भेट

**अक्कलकोट** : विद्यार्थ्यांमध्ये सुक्ष्म निरीक्षण,जिज्ञासा व नवीन ज्ञानप्राप्ती इत्यादी गुण वाढीस लागण्यासाठी सौ सुरेखा कल्याणशेट्टी विद्यालयातील इयत्ता ८ ते १० वी विद्यार्थ्यांची उद्योग क्षेत्रास भेट म्हणून अक्कलकोट एम आय डी सी येथील श्री मनोज कल्याणशेट्टी यांचे अवनिश व्हेंचर्स, श्री मल्लिनाथ मसुती यांचे पी एम प्लास्टिक व श्री राजू कोळी यांच्या ऑईल मिलला भेट देण्यात आली यावेळी मनोज कल्याणशेट्टी यांनी कच्चा मालापासून प्लास्टिक निर्मिती, यंत्राद्वारे कशाप्रकारे होते याचे प्रात्यक्षिक दाखवले व सर्व यंत्रकार्याची माहिती दिली. तसेच प्रथमेश मसुती यांनी प्लास्टिक पासून यंत्राद्वारे फाईल क्लिप कशी तयार होते, याचे प्रात्याक्षिक दाखवले व सर्व यंत्रकार्याची माहिती दिली. यावेळी लायन्स क्लबचे अध्यक्ष मल्लिनाथ मसुती यांच्या कडून सर्व विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आले यावेळी लायन्स क्लबचे माजी अध्यक्ष राजेंद्र हत्ते,सुभाष गडसिंग, प्रभाकर मजगे,राजशेखर कापसे ,बिराजदार पर्यवेक्षक मोतीलाल चव्हाण हे उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांनी वनभोजनाचा आनंद घेतला ही क्षेत्रभेट यशस्वी होण्यासाठी सुरेश रुग्गे, खंडेराव घाटगे,कुमार जाधव, कल्पना, स्वामी, पूजा कडगबगावकर यांनी प्रयत्न केले.

## श्रद्धानंद मंडळातर्फे नवरात्र महोत्सव

**सोलापूर** : श्रद्धानंद समाज सार्वजनिक नवरात्र महोत्सव मंडळाच्यावतीने नवरात्र महोत्सव साजरा करण्यात आला आणि नवरात्रीच्या नऊ दिवसामध्ये मंडळातर्फे सामाजिक विविध उपक्रम राबविण्यात आले. यावेळी मंडळाचे उत्सव अध्यक्ष बालाजी शिंदे यांचा नवरात्र महोत्सवाचे कार्य उत्तमप्रकारे पार पाडल्याबद्दल मानाचा आजोबा गणपती ट्रस्टचे अध्यक्ष चिदानंद वनारोटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## प्रेरणा फाउंडेशनतर्फे आयोजित स्पर्धेचे बक्षीस वितरण

**सुराज्य/सोलापूर**

प्रभाग २६ मधील रेणुका नगर मधील रेणुका माता मंदिराच्या आवारात नवरात्र व कोजागिरी पौर्णिमाचे औचित्य साधून प्रेरणा सोशल फाउंडेशन आयोजित रेणुका नर्सरी स्कूल तर्फे बक्षीस वितरणाचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्याचे उद्घाटन माजी नगरसेविका राजश्री चव्हाण, सुनिता रोटे यांचे हस्ते करण्यात आले. सुमेध बहुउद्देशीय संस्थाच्या अध्यक्षा जानवी माखीजा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या.

यावेळी रांगोळी स्पर्धेत सुप्रीती कोळी, स्नेहा केदार, राणी सोनटक्के, संगीत खुर्चीत प्रचिती ढोणे, सुषमा डिक्कित,जानवी जयस्वाल, राणी सोनटक्के वेशभूषा स्पर्धेत जानवी जयस्वाल, राणी सोनटक्के, संगीत खुर्चीत पूजा शेंडगे, सुनिता विजापुरे, गरबा दांडियामध्ये सरोजा गायकवाड, सुषमा डिके, तन्वी बगल, साक्षी पांडे संगीत खुर्ची पुरुष, हर्षद कोळी, करण विश्मकर्मा आदी यश मिळवले.

कार्यक्रमासाठी आदित्य पवार,रोशनी चव्हाण, पूजा कांबळे,विद्या खेडगीकर, सतीश मिरजकर, वैशाली वाघे, स्तुती पांडे,पूजा वाघमारे यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन- ऐश्वर्या हिबारे यांनी केले.

## वांगी, टोमॅटो महागले

कृषी उत्पन्न बाजार समितीकडून सोमवार, १० ऑक्टोबर रोजी मिळालेल्या माहितीनुसार वांगी, टोमॅटो आदींचे दर वाढले.



याबरोबरच ढोवळी मिरची, गवार, काकडी, फ्लॉवर, चाकवत, कांदा, बटाटा आदी भाजीपाल्यांच्या किंमती ५०० ते हजार रूपयेने वाढल्या. तर कारली, लसूण, हिरवी मिरची, अंबाडी भाजी, लिंबू, शिराळी दोडका आदींच्या किंमती प्रतिक्विंटल ५०० ते हजार रूपयेने कमी झाल्या.

### सोलापूर बाजारभाव

| शेतमाल | कमीत कमी दर (क्विं. ) | जास्तीत जास्त दर (क्विं. ) | सर्वसाधारण दर |
|---|---|---|---|
| सफरचंद | ४,००० | ८,००० | ६,००० |
| कारली | १,००० | २,५०० | १,५०० |
| वांगी | १,००० | ५,००० | ३,००० |
| कोबी | ४०० | १,७०० | १,००० |
| ढोवळी मिरची | १,५०० | ३,५०० | २,००० |
| गवार | २,००० | ५,००० | ३,००० |
| कोथिंबीर | ५०० | १,००० | ७०० |
| काकडी | ४०० | ४,००० | २,५०० |
| फ्लॉवर | ८०० | २,१०० | १,२०० |
| लसूण | ९०० | २,५०० | १,३०० |
| घेवडा | ४,००० | ४,५०० | ४,००० |
| हिरवी मिरची | २,५०० | ३,५०० | २,५०० |
| अंबाडी भाजी | ३०० | ४०० | ३०० |
| कांदा पात | ५०० | ५०० | ५०० |
| बटाटा | ७५० | २,१०० | १,९०० |
| लिंबू | १,४०० | ५,५०० | ३,००० |
| तांदूळ | ३,०१० | ६,३५० | ३,८०० |
| दोडका | ५०० | २,००० | १,००० |
| शेपू | ४०० | ८०० | ५०० |
| पालक | २०० | ५०० | ३०० |
| टोमॅटो | ५०० | ३,१०० | १,५०० |
| गहू | २,२८० | ३,३१५ | २,७७० |

# विविध मागण्यांसाठी दिव्यांगांचा महानगरपालिकेवर हलगी मोर्चा

**सुराज्य/सोलापूर**

विविध प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रीय दृष्टीहीन संघाच्या वतीने सोलापूर महापालिकेवर दिव्यांगांचा हलगी मोर्चा काढण्यात आला.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून या मोर्चास प्रारंभ झाला. त्यानंतर पुढे सरस्वती चौक मार्गे चार हुतात्मा पुतळा चौक, डॉक्टर आंबेडकर चौक मार्गे महापालिका प्रवेशद्वारासमोर या मोर्चाचा समारोप करण्यात आला. विविध मागण्यांचे फलक हाती घेऊन घोषणाबाजी करत दिव्यांग बांधव या मोर्चात सहभागी झाले होते. महापालिकेसमोर नाद व धरणे आंदोलन करण्यात आले. विविध मागण्यांचे अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. दिव्यांगांचा नोकर भरतीतील रिक्त अनुशेष तात्काळ भरावा. राष्ट्रीय दृष्टीहीन संघ, महाराष्ट्र सोलापूर शाखेला शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी कार्यालयासाठी गाळा उपलब्ध करून द्यावा. सोलापूर महापालिकेकडील स्थानिक निधीतील पाच टक्के निधी पूर्वलक्षी प्रभावाने तात्काळ खर्च करावा. मनपा मालमत्ता करातून ५० टक्के मिळणारी सवलत विनाअट लागू



करावी. दिव्यांना दिला जाणारा निर्वाह भत्ता हा नियमित द्यावा. महापालिका हद्दीतील मोकळ्या जागा ,स्टॉल व गाळे अंध, अपंगांकरिता शासन निर्देशानुसार २०० चौरस फूट राखीव ठेवून व्यवसायासाठी उपलब्ध करून द्यावा. महापालिका आस्थापनावरील दिव्यांग अनुशेषातील पदोन्नती बाबत तात्काळ कार्यवाही करावी, महापालिका आस्थापनेवरील दिव्यांग कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वाहन भत्ता लागू करावा. महापालिकेकडील अंध अपंग कर्मचाऱ्यांना सहाय्यभूत उपकरणे उपलब्ध करून द्यावीत. महापालिका कार्यक्षेत्रातील अंध - अपंग बेघरांचा सर्वे करून प्रधानमंत्री आवास योजना किंवा इतर योजनेतून त्यांना घरकुल मंजूर करावे.

या आंदोलनात राष्ट्रीय दृष्टीने संघ जिल्हा शाखेचे जनरल सेक्रेटरी राजू शेळके, खजिनदार ज्ञानेश्वर काटेकर, सचिव उदय सुर्वे, सिद्धू बिराजदार, इम्रान शेख, अंजली शेळके, कर्मचारी संघटनेचे शंतनू गायकवाड यांच्यासह पदाधिकारी व अंध - अपंग दिव्यांग बांधव मोठ्यासंख्येने सहभागी झाले होते.

**नावात बदल**

माझे जुने नाव : **मलेका बेगम अब्दुल रहीमान चाऊस** असे असून ते बदलून नविन नाव : **मलेका रऊफ शेख** असे झाले आहे. तरी सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

**पत्ता** : घर नं. 1B, कल्याण नगर-3, जुळे सोलापूर, सोलापूर - 413004
**ऑफी.नं. 76631/7.10.2022**



## शिवाजी महाले यांच्या जयंतीनिमित्त नातेपुते नगरपंचायतीस प्रतिमा भेट

**सुराज्य/नातेपुते** : नातेपुते येथे नगरपंचायत व तलाठी कार्यालय येथे शूरवीर जिवाजी महाले जयंतीनिमित्त प्रतिमा पुजन नातेपुते येथे जिवा महाले जयंतीनिमित्त शूरवीर जिवाजी महाले यांच्या प्रतिमा पुजन नगराध्यक्ष उत्कर्ष राणी पलंगे यांच्या हस्ते करण्यात आले व तलाठी कार्यालय येथे उन्हाळे भाऊसाहेब यांच्या हस्ते शूरवीर जिवाजी महाले याच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. नगरपंचायतीस व तलाठी कार्यालय यास शूरवीर जिवाजी महाले यांच्या जयंतीनिमित्त शूरवीर जिवाजी महाले यांची प्रतिमा भेट देण्यात आली. यावेळी ऊमेश पलंगे, चंद्रकांत धालपे, गोरख ढोबळे, गणेश काळे (अध्यक्ष, जय महाराष्ट्र गणेश मंडळ) नवनाथ बर्गे, प्रसाद पिसे, आबा वणवे, नवनाथ राऊत, किशोर राऊत, शिवाजी कोरटकर, शहर उपाध्यक्ष गणेश खंडागळे, युवक शहर अध्यक्ष हर्षद भुसारे, काशिनाथ कोल्हाळे, सचिन यादव, संतोष कोल्हाळे, संतोष राऊत, देवानंद कोल्हाळे, बंटी राऊत नगर पंचायत कर्मचारी व मान्यवर ऊपस्थित होते.



## महर्षी वाल्मिकी जयंती मोहोळ येथे उत्साहात साजरी

**सुराज्य/मोहोळ** : मोहोळ येथील लखन भाऊ कोळी युवा मंचच्या वतीने आद्यकवी महर्षी वाल्मिकी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मोहोळ ग्रामदैवत श्री नागनाथाचे पुजारी तथा महाराज श्री राजेंद्र खर्गे व सेवानिवृत्त मंडलाधिकारी जगदीश कोळी यांच्या शुभहस्ते महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक सुशील क्षीरसागर, चंद्रकांत गोडसे, सचिन फाटे, डॉ. सागर फाटे, अप्पू बिराजदार, सागर लेंगरे, नानासाहेब डोके, आकाश गुरव, ज्ञानेश्वर सिताप, विठ्ठल कोळी, अजित भोसले, प्रमोद कांबळे, धीरज कस्तुरे, अनंत नागनकरी, पंकज वेदपाठक, खंडू लवटे, विलास पाटील, सुरेश कोळी, पप्पू कोळी, राजेंद्र देवकते, महेश माने, राजन घाडगे, राजेंद्र वाकळे, नरेंद्र कसबेकर, गणेश कोळी, संतोष वायचळ, सागरभाऊ कोळी, लखनभाऊ कोळी, कुमार कांबळे, अमोल कोळी, बाळासाहेब कोळी, दीपक कांबळे, जावेद शेख, पंकज कांबळे, सोमनाथ कोळी, लखन चव्हाण, भाई प्रकाश कोळी, अजय घळगे, अक्षय कस्तुरे, ऋषी घळगे, सुरज परमार, धीरज कस्तुरे, विशाल कोळी, उज्वल वाघमारे, नवनाथ कोळी, माजी सरपंच बिलाल भाई शेख, शंकर कोळी, प्रथम कोळी, राजा चव्हाण, सुरज चव्हाण, महेश गोरवे, नागेश कोळी, सक्षम कोळी, हर्षद कोळी आदि. प्रमुख मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## ईद-ए-मिलादनिमित्त वेळापूरमध्ये जल्लोष

**सुराज्य/वेळापूर** : संपूर्ण जगाला शांती व समतेचा संदेश देणारे प्रेषित पैगंबर यांची जयंती सालाबाद प्रमाणे ९ ऑक्टोबर रोजी वेळापूर येथे आनंदमय वातावरणात साजरी करण्यात आली. त्यानिमित्ताने वेळापुर जुलुस कमिटी तर्फे मुस्लिम बांधवांच्या वतीने पारंपारिक पध्दतीने वेळापूर शहरातून मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीस शाही मस्जिद येथुन वाजत गाजत प्रारंभ झाला. सदर मिरवणुकीत घोडेस्वार, बगींचा उंट यांचा समावेश होता, बगीचा सुंदररित्या सजवण्यात आले होते. मिरवणुकीत हातात हिरवे झेंडे घेऊन लहान मुले आणि तरुणांची मोठी उपस्थिती होती. वेळापुरात मिरवणूक मार्गावर अनेक ठिकाणी मिठाई, पाणी, फळे आदींचे वाटप करण्यात आले. सदर मिरवणूक व्यापार पेठ, वेळापूर ग्रामपंचायत, अर्धनारी नटेश्वर मंदिर या मार्गावरून पालखीचौक जवळ येताच राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्ह्याचे नेते उत्तमराव जानकर, माजि जि प सदस्य बाळासाहेब धाइंजे, माजि पं. स. सदस्य मधुकर पाटील, प. स. अजय सकट, वेळापूर ग्रामपंचायत सदस्य संजयआबा मंडले, वाहन चालक मालकप्रतिनिधी महासंघ महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष संजय देशपांडे, लक्ष्मण माने देशमुख, भाऊसाहेब जानकर, शिवाजी मोहिते, अमोल पनासे, विनायक माने, नागेश क्षीरसागर, जवान माने देशमुख, हनुमंत वायदंडे, अमर थिटे, जब्बार मुलाणी यांनी मिरवणुकीचे स्वागत करून खाऊचे वाटप केले.

सुराज्य सोलापूर
Classified

**विवाह विषयक**

● सर्व जाती धर्मातील प्रथम वधु/वर, विदुर, विधवा, घटस्फोटीत, आंतरजातीय, शासकीय/निमशासकी भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा लग्न जमेपर्यंत स्थळं उपलब्ध करुन दिले जातील.
श्री तुळजाभवानी वधु-वर सुचक केंद्र, तुळजापूर.
संपर्क : 7387906921
(071122)

**पाहिजे**

● श्री. तुळजाभवानी वधु-वर सुचक केंद्र, तुळजापूर येथील कार्यालयात १ स्मार्ट लेडीची आवश्यकता (फोनवर माहिती सांगण्यासाठी) आहे. शिक्षण किमान १२ वी आवश्यक, अपेक्षित पगार दिला जाईल. गरजूंनी संपर्क साधावा.
श्री तुळजाभवानी वधु-वर सुचक केंद्र, तुळजापूर.
संपर्क : 8378851719
(211022)

# शास्त्रीय नृत्याचे बहारदार सादरीकरण

## युवा महोत्सवात विद्यार्थ्यांचा जल्लोष; विविध स्पर्धेतून गुणदर्शन

**सुराज्य/मंगळवेढा**

**भारतीय संगीताच्या तालावर शास्त्रीय नृत्याचे बहारदार सादरीकरण करून युवक युवतींनी युवा महोत्सवातील रसिकांना घायाळ करून सोडले. खूपच उत्साह आणि जल्लोषात या स्पर्धा पार पडल्या. रसिक प्रेक्षकांचाही या स्पर्धेला उत्तम प्रतिसाद राहिला.**

युवा महोत्सवाच्या दुसऱ्या दिवसाची सुरुवात दलित मित्र कदम गुरुजी मुख्य रंगमंचावर शास्त्रीय नृत्याने झाली. सोमवारच्या प्रसन्न सकाळी शास्त्रीय नृत्य पाहण्यासाठी युवा महोत्सवातील स्पर्धकांनी मोठी गर्दी केली होती. कोल्हापूर भाजपचे युवा नेते विश्वराज धनंजय महाडिक यांच्या हस्ते नटराजाच्या प्रतिमेचे पूजन करून शास्त्रीय नृत्याच्या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

सर्वप्रथम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अधिविभागातील विद्यार्थिनी वीणाश्री निंबर्गी हिने आपल्या सुंदर नृत्याचा नजराणा सादर करून रसिक प्रेक्षकांकडून वाहवा मिळवली. तिने भरतनाट्यमचा सुंदर नृत्याविष्कार घडविला. त्यानंतर दलित मित्र कदम गुरुजी सायन्स महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याने शास्त्रीय नृत्याचे सादरीकरण केले. संगमेश्वर महाविद्यालयाची विद्यार्थिनी उर्मी कुलकर्णी हिने अतिशय तालबध्दरीत्या कथ्थक नृत्याचा नृत्याविष्कार घडवीत रसिक प्रेक्षकांची मने जिंकली.

दयानंद महाविद्यालय, केबीपी पंढरपूर, शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालय, अकलूज, वालचंद महाविद्यालय, शिवाजी महाविद्यालय, बार्शी, वालचंद अभियांत्रिकी या महाविद्यालयाच्या संघानेही उत्कृष्टरीत्या शास्त्रीय नृत्याचे सादरीकरण केले. १३ महाविद्यालयांनी यात सहभाग घेतला. भारतीय संस्कृतीत शास्त्रीय नृत्याला विशेष महत्त्व आहे. युवा महोत्सवाच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीतील एक महत्त्वाच्या कलेची जोपासना होताना दिसून आली पारंपारिक वाद्याने महोत्सव नगरी दुमदुमली

फोक ऑर्केस्ट्रामध्ये बासरीचा सुमधूर स्वर टाळ-मृदुंगाचा गजर... पिपाणीची ललकारी... ढोल-ताशांचा निनाद... हलगीचा कडकडाट... अन् डमरूच्या आवाजाने एकाच वेळी सादर केल्यानंतर युवा महोत्सव नगरी दुमदुमली. महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी दलित मित्र कदम गुरुजी मुख्य रंगमंचावर फोक ऑर्केस्ट्राच्या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेला तरुणाईचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. फोक ऑर्केस्ट्रा स्पर्धेत एकूण ६ महाविद्यालयांनी



सहभाग नोंदवित आपली कला सादर केली. यामध्ये प्रामुख्याने विद्यार्थी व विद्यार्थिनींनी पारंपरिक वाद्ये वाजवीत रसिकांना ठेका धरायला भाग पाडले. यावेळी रंगमंचासमोरील तरुणाईने वाद्यांच्या तालावर ठेका धरून युवा महोत्सवाचा आनंद द्विगुणित केला. खूपच उत्साह, जल्लोषात फोक ऑर्केस्ट्राच्या स्पर्धा पार पडल्या.

सुरुवातीला संगमेश्वर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी तबला, पेटी ढोल-ताशा, हलगी वाजवून उपस्थितांना भारावून सोडले. तरुणांच्या अंगी किती प्रकारच्या कला असतात, हेच या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यावेळी दाखवून दिले. त्यानंतर दलित मित्र कदम गुरुजी सायन्स महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपली कला प्रदर्शित केली. त्यांनी टाळ, मृदुंग, तबला, पेटी हलगी व बासरीचा वापर केला. विद्यार्थी व प्रेक्षकांनाही त्यांच्या या कलेला कलेला दाद दिली.

शिवाजी महाविद्यालय, बार्शीच्या विद्यार्थ्यांनी सर्व प्रकारची पारंपरिक लोकवाद्यांवर कला सादर करीत युवा महोत्सवात आणखीन जोश निर्माण केला. ढोल, ताशा, डमरू, हलगी, तबला, पेटी, घुंगरू आदी सर्वच वाद्ये वाजवीत त्यांनी अनोख्या कलेचे दर्शन घडविले. केबीपी, पंढरपूर, दयानंद महाविद्यालय, शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज या संघाचेही सादरीकरण दमदार झाले. अलीकडच्या काळातच युवा महोत्सवात सहभागी करण्यात आलेल्या फोक आर्केस्ट्रा स्पर्धेला महाविद्यालयांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. स्थळ चित्र स्पर्धेमध्ये माचनूर येथील सिध्देश्वर मंदिर परिसराची स्थळचित्रांसाठी निवड करण्यात आली. यामध्ये ३४ महाविद्यालयाने सहभाग नोंदवून अतिशय चांगल्या प्रकारे हुबेहूब चित्रे अगदी सहजपणे रेखाटली. युवा महोत्सवामध्ये वाद विवाद स्पर्धा सुगम गायन इत्यादी स्पर्धा पार पडल्या. शास्त्रीय सुरवाध्द स्पर्धेमध्ये संतूर वादनात पाच महाविद्यालयाने पेटीवादनात १० महाविद्यालय तर बासरी साठी पाच महाविद्यालयाने आपला सहभाग नोंदवला. पथनाट्य स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सामाजिक घटकावर प्रभाव टाकला.





## ईद-ए-मिलादनिमित्त शालेय साहित्य वाटप

**सुराज्य/मोहोळ** : ईद-ए-मिलादनिमित्त मोहोळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळा गुलशन नगर यांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य संच वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी सरपंच हाजी बिलालभाई शेख हे उपस्थित होते तर मोहोळ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अशोक सायकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जुबेर शेख, अक्रम शेख, माजी नगरसेविका नसीमा भोंगे, हाजी युनूस कुरेशी, सामाजिक कार्यकर्ते राजन घाडगे, नसीर मोमीन, जिब्राईल शेख, युवा नेते लखन कोळी, हजरत शेख, मुख्याध्यापक संजय महामुनी, केंद्रप्रमुख हमीदखा पठाण आदि. प्रमुख मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांचा सत्कार शाळेच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी शाळकरी विद्यार्थ्यांना पोलीस निरीक्षक अशोक सायकर यांच्या शुभहस्ते शालेय साहित्याचे संच व प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळेच्या मुख्याध्यापक खान मुख्याध्यापिका सायरा मकदूम नदाफ यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. बागलकोटे सालेहा शेख, शगुप्ता शेख, अर्चना बदर, मसूद सिद्दिकी, चौधरी आदि. शिक्षक - शिक्षिका उपस्थित होते यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिनत शेख व मोहसीना बांगी यांनी केले तर कार्यक्रमाचे नियोजन व आभार अन्सारी यांनी केले विदयार्थी - विदयार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## 'आमचा गाव, आमचा विकास' केगावमध्ये कार्यशाळा

**सुराज्य/सोलापूर**

पंचायत समिती उत्तर सोलापूर, उत्तर सोलापूर तालुक्यातील ग्रामपंचायतमधील सरपंच व ग्रामसेवक यांचे दोन दिवसीय प्रशिक्षण पुणे येथील यशवंतराव विकास प्रबोधिनीच्या वतीने केगाव येथील डाळिंब संशोधन केंदंत दिनांक ०६ व ०७ ऑक्टोबर २०२२ रोजी आयोजित करण्यात आले होते.

दोन दिवसीय कार्यशाळेत प्रशिक्षक म्हणून शिवाजी पवार, महादेव बेळे, राजेंद्र वारगड, सोमनाथ शिंदे यांनी सविस्तर व घटक निहाय प्रशिक्षण देण्यात आले. शासनाने दिलेल्या ९ गोल लक्षात घेऊन, शाश्वत विकास समोर ठेवल्यास १५ व्या वित्त आयोगाचे २०२३-२४ चे योग्य आराखडे तयार केल्यास निश्चित गावाचा सर्वांगीण विकास साध्य होईल. गावातील सर्व घटकांना सामाऊन एक आदर्श आराखडा कसा तयार करण्याचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. आदर्श गाव आदर्श आराखडा कसा याचेही विशेष मार्गदर्शन प्रवीण प्रशिक्षक यांनी दिले. सदर कार्यशाळेस गटविकास अधिकारी जष्मीन शेख, महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी समाधान नागने, कृषी अधिकारी आर पी कांबळे, विस्तार अधिकारी ए यु तोडकरी, विस्तार अधिकारी एस बी पाथरवट, ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष गंगाधर कांबळे, एस आर राठोड, श्री खरबस, श्रीहरी शिंदे, धीरज शिंदे, उत्तर तालुक्यातील सरपंच व सद्स्य उपस्थित होते.

'एमएसपी'तील तोटा भरून काढण्यासाठी

## 'भावांतर योजना' लागू करा

**रयत क्रांती पक्षाची मुख्यमंत्र्यांकडे मागणी**

**सुराज्य/सोलापूर**

केंद्र सरकारने जाहीर केलेल्या शेतीमालाच्या आधारभूत किमती (एमएसपी) पेक्षा कमी दराने वेगवेगळ्या बाजार समित्यांमध्ये शेतमाल खरेदी- विक्री होत असते. त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतीमालाची आधारभूत किंमत मिळत नाही यावर तात्पुरता उपाय म्हणजे मध्य प्रदेश सरकारच्या योजनेप्रमाणे शेतीमाल भावांतर योजना महाराष्ट्र सरकारनेसुध्दा चालू करावी, अशी मागणी रयत क्रांती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष भानुदास शिंदे यांनी लेखी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे, की शेतीमालाचे उत्पादन वाढवल्यामुळे खरतर शेतकऱ्यांचा आर्थिक फायदा होणे अपेक्षित असते. तसा तर तो शेतकऱ्यांचा निसर्गदत्त अधिकारच आहे. परंतु ज्या शेतीमालाचे उत्पादन शेतकरी वाढवतो त्या शेतीमालाचे बाजारभाव आधारभूत किमतीपेक्षा कमी होतात.

म्हणजे अधिक उत्पादन देश हितासाठी निर्माण केल्यावर शेतकऱ्यांना बक्षीस, फायदा मिळण्याऐवजी आर्थिक दंड व तोटाच मिळतो. हाच का आपला कृषिप्रधान भारत व कृषिप्रधान भारतातील कृषी व्यवस्था. शेतकऱ्यांना आर्थिक स्वातंत्र्य कधी मिळणार असा प्रश्न उपस्थित होत आहे.

भावांतर योजना चालू झाल्यास आधारभूत किमतीपेक्षा कमी किमतीला विक्री झालेल्या शेतीमालास आधारभूत किंमत व मिळालेली कमी किंमत यातील तफावत या योजनेमार्फत शेतकऱ्यांना देणे सोपे होईल. शेतकऱ्यांना आधारभूत किंमत मिळवून देता येईल. शेतकरी हितासाठी महाराष्ट्रामध्ये ही मध्यप्रदेश सरकारच्या धर्तीवर भावांतर योजना लागू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# स्वेरीच्या तब्बल १०८ विद्यार्थ्यांची 'विप्रो' कंपनीत निवड

**सुराज्य/पंढरपूर**

विप्रो' या बहुराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयातील तब्बल १०८ विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्युवद्वारे निवड करण्यात आली आहे, अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी दिली.

विप्रो' या नामांकित कंपनीच्या निवड समितीने गोपाळपूर येथील स्वेरी इंजिनिअरिंग कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यांनी या निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून गणेश बाळासाहेब बागल, मनोज ज्ञानेश्वर भूमकर, शिवानी राजकुमार घायतिडक, स्नेहल शिवाजी बोराडे, अभय प्रताप देशमुख, अभिजीत अजय कारंडे, अभिषेक महेश आराध्ये, ऐश्वर्या दत्तात्रय तोडकरी, अक्षदा मिलिंद देशपांडे, अनिशा शांतीनाथ सावंत, अश्रुभा लहू भोरे, आशुतोष अतुल डोळे, चैतन्य वैभव भोसले, चंद्रोदय विठ्ठल कलशेट्टी, चेतन रमेश क्षीरसागर, दीक्षा दिगंबर लाळे, दीप्ती बंकट पाटील, फिझा सैफन शेख, गौरव राजेंद्र वाघमारे, गौरी प्रमोद कुलकर्णी, गायत्री विनायक दिक्षित, गितेश्वरी अनिल शिंदे, ऋषिकेश संतोष साठे, कोमल सुधीर कडलासकर, कोयल विजय सावंत, मधुरा मिलिंद बडवे, मुकुंद सुभाष खपाले, प्राजक्ता रामचंद्र पलसे, पूजा आबासाहेब काटे, प्रणाली केशव खोटे, प्रणेश प्रकाश सुतार, प्रसाद रामचंद्र भोसले, प्रशांत जगन्नाथ जलगीरे, प्रतीक राजेंद्र यादव, प्रतीक सुभाष देशपांडे, प्रीती ज्ञानेश्वर चव्हाण, प्रियांका मारुती माने, रसिका अखिलेश वेळापुरे, रोहित किरण भोसले, साक्षी मनोज कोतलवार, सानिका रमेश व्यवहारे, शिवानी राजेश आवताडे, श्रुती बापूसाहेब बिले, श्रुती श्रीनिवास बडवे, स्नेहा चिंतामणी लोहकरे, वैष्णवी ज्ञानेश्वर जगनाडे, विशाल पांडुरंग शिंदे, विश्वजीत उदय राजोपाध्ये, संयोगिता मदन जगताप, आदित्य दत्तात्रय पवार, अविनाश दादासाहेब पवार, गायत्री निवृत्ती कदम, गिरिजाप्रसाद जनाप्पा घेरडे, इम्रान इक्बाल मोगल, ईश्वरी गोविंद शेळके, जयेश सतीश इंगळे, केतकी भास्कर देशपांडे, क्षिप्रा विद्याधर कुरणावळ, लक्ष्मी गुरुपादप्पा अळगी, नसरीन सलीम शेख, नितीन तानाजी गुजरे, ओंकार मुकुंद लाड, ओंकार महादेव यळसंगे, पल्लवी संजय माने, पवन संतोष वेदपाठक, राहुल इरन्ना सुतार, रेणुका नामदेव पाटील, ऋषिकेश ईश्वर चव्हाण, ऋषिकेश श्रीकृष्ण मोरे, सत्यजित बालाजी मुळे, शुभम बबन औसेकर, श्वेता शिवाजी मगर, सुजय पुरुषोत्तम गाटे, सुनील औदुंबर लेंडवे, सुप्रिया गोपीनाथ पवार, सुरज गणेश जाधव, सुरज हरिदास घावटे, सुयश शंकर अवताडे, योगेश महेश म्हंता, गायत्री राजेंद्र एकतपुरे, शंतनु रघुनाथ पाटील, शिवम सुनील साळुंखे, शुभम तारकेश्वर दोशी, स्नेहल पोपट दळवे, आकाश प्रसाद अजगर, आकाश संभाजी माने, अमोल धोंडीबा सूळ, चेतन मच्छिंद्र वाघमोडे, दीपक पांडुरंग शिंदे, गणेश शंकर तोडकर, हर्षल राजेंद्र नागटिळक, कन्हैया सुदर्शन वैरागकर, किरण विनायक हंबीरराव, मंथन मिलिंद दीक्षित, मोहम्मद आजम एजाज अहमद शेख, ओंकार संतोष पवार, योगेश कुमार पाटील, प्रतिक प्रवीण देशमुख, पृथ्वीराज सोमनाथ देशमुख, ऋषिकेश विद्याधर पाटील, सचिन अशोक क्षीरसागर, संतोष हनुमंत पाटील, सौरभ बंडू कडसरे, सौरभ चंद्रकांत चव्हाण, श्रेयश राजाराम चव्हाण, विवेक दशरथ रोंगे, युवराज विनोद शेलार व शुभम अर्जुन वाघमारे या १०८ विद्यार्थ्यांची निवड केली. या विद्यार्थ्यांना प्रत्येकी वार्षिक रु. ३.५ ते ५.५ लाखांपर्यंतचे पॅकेज मिळाले आहे.

संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष नामदेव कागदे, उपाध्यक्ष अशोक भोसले तसेच संस्थेचे पदाधिकारी व विश्वस्त, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह पालकांनी विप्रो' या कंपनीमध्ये कॅम्पस इंटरव्ह्यूमधून निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# डाळ आणि तेलाचे भाव कडाडले

# महागाईच्या तेलाने उत्सवाचे दिवे पेटणार का?

सुराज्य/मुंबई

**सणासुदीचे दिवस आले की सर्वच वस्तूंच्या किंमतीत वाढ होते. अशातच ऐन सणांच्या दिवसात सर्वसामान्यांना पुन्हा एकदा महागाईचा सामना करावा लागणार आहे.**

दिवाळीच्या आधीच डाळींच्या किंमतीत वाढ झाली आहे. तूर डाळीच्या किंमतीत मागील आठवड्याभरात चार ते पाच रुपयांची वाढ झाली आहे. त्यासोबतच खाद्य तेल आणि उडीद डाळ यांच्याही किंमतीत वाढ झाली आहे. घाऊक बाजारासह किरकोळ बाजारावरही डाळींच्या किंमतीचा परिणाम आता जाणवू लागला आहे. उत्पादनात घट होण्याच्या भीतीने डाळींची दरवाढ करण्यात आलेली आहे. मागील आठ दिवसांमध्ये तूर डाळीच्या किंमतीत चार ते पाच रुपयांची वाढ झाली आहे. सध्या



तूर डाळींचा घाऊक बाजारातील दर प्रति किलो ११० रुपये आहे. तर किरकोळ बाजारात तूर डाळींचा दर १२५ ते १३० रुपये किलो एवढा आहे.

यावर्षी अतिवृष्टीमुळे डाळीच्या पिकांना मोठ्या परमनंट फटका बसला आहे. डाळींच्या पिकांचे पावसात खूप नुकसान झाले आहे. येत्या काळात डाळींचे पिकं घटण्याची सुद्धा शक्यता आहे. त्यामुळे डाळींचे दर वाढण्यास आतापासूनच सुरुवात झाली आहे. एकीकडे रुपयांचं मूल्यही घसरत आहे. त्याच सोबत खाद्यतेलाचे दर सुद्धा वाढण्याची भीती आहे. खाद्यतेल ३ ते ४ रुपयांनी महागले आहे. यात आणखी वाढही होण्याची भीतीही व्यक्त केली जातेय.

दरम्यान सीएनजी आणि पीएनजीच्या किंमतीतही वाढ नोंदवण्यात आली होती. या सगळ्याचा परिणाम सर्वसामान्यांच्या जगण्यावर थेट परिणाम करतो. सीएनजीचे दर वाढल्यामुळे दळणवळण सुद्धा महागले. त्यामुळे भाज्या, शेतीचा माल, या सगळ्यासोबत इतर सर्व मालाची ने-आणसुद्धा महागली आहे. दरम्यान या सगळ्या गोष्टी असताना सरकारने नुकतंच घोषित केलं आहे की रेशनकार्ड धारकांना मोफत रवा, तूर डाळ, तेल आणि साखर देण्यात येणार आहे. पण ते किती लोकांपर्यंत पोहोचते आहे ते महत्वाचे



# बेचाळीस शाळांवर घाला?

## समायोजनाचा गटशिक्षणाधिकाऱ्यांचा अहवाल

सुराज्य/नाशिक

**जिल्ह्यातील २३६ शाळांची पटसंख्या वीसपेक्षा कमी असल्याचे निदर्शनास आले असून, त्यापैकी ४२ शाळांचे समायोजन शक्य असल्याचा अहवाल संबंधित गटशिक्षणाधिकाऱ्यांमार्फत जिल्हा शिक्षण विभागाला देण्यात आला आहे. मात्र, समायोजन प्रक्रियेत अडथळे आल्यास जिल्ह्याच्या दुर्गम आदिवासी भागातील वस्ती-पाड्यांवरच्या या शाळांमधील विद्यार्थी शाळाबाह्य होण्याची चिन्हे आहेत.**

राज्य सरकारमार्फत ० ते २० विद्यार्थी पटसंख्येच्या राज्यात किती आहेत आणि या शाळा बंद करण्याबाबतची कार्यवाही कोणत्या स्तरावर आहे, याबाबतची माहिती मागविण्यात आली होती. पटसंख्या २० पेक्षा कमी असणाऱ्या शाळा मुख्यत: ग्रामीण, दुर्गम भागात असल्याचे यापूर्वीही समोर आले असून, आता पुन्हा एकदा जिल्ह्याच्या प्राथमिक शिक्षण विभागामार्फत या शाळांमधील विद्यार्थिसंख्येचा आढावा घेण्यात आला आहे.

यानुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या संचमान्यतेनुसार जिल्ह्यातील ४४९ शाळांमधील पटसंख्या २० पेक्षा कमी असल्याचे समोर आले आहे. परंतु, या शाळांच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला असता यापैकी १९३ शाळांची पटसंख्या या शैक्षणिक वर्षात वाढली असून, २३६ शाळांमध्ये मात्र अद्यापही विद्यार्थिसंख्या २० च्या आत आहे.

नाशिक जिल्ह्याच्या दुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना नदी, नाले ओलांडून अनेकदा टेकड्या पार करून शाळेत पोहोचावे लागते. अशा १९४ शाळा जिल्ह्यामध्ये असल्याचे या अहवालात नमूद असून, त्यामुळे या शाळा वगळता उर्वरित ४२ शाळा बंद करून, शिक्षक-विद्यार्थ्यांचे समायोजन जवळपासच्या शाळांमध्ये करणे शक्य असल्याचे गटशिक्षणाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाला कळविले आहे. अन्य २० शाळांच्या शालेय समितीने मात्र शाळा समायोजनास नकार दिला आहे.

नाशिक जिल्ह्यातील पेठ, सुरगाणा, त्र्यंबकेश्वर, कळवण, इगतपुरी तालुक्याचा बहुतांश भाग आदिवासीबहुल असून, या विद्यार्थ्यांसाठी वस्त्या, पाड्यांवरही शाळा सुरू करण्यात आल्या आहेत. कोव्हिड कालावधीत या शाळांमधील विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान झाले आहे. यंदा या शाळा पूर्ववत सुरू होतात न होतात तोच कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्यबाबत राज्य सरकारने पुन्हा हालचाली सुरू केल्या आहेत. असे झाल्यास हा निर्णय अनेक विद्यार्थ्यांना शाळाबाह्य करण्याची शक्यता आहे.



## गुजरातचे मोधेरा देशातील पहिले 'सौरऊर्जा ग्राम'

**गुजरात :** मेहसाणा जिल्ह्यातील मोधेरा हे देशातील पहिले १०० टक्के सौरऊर्जा वापरणारे गाव ठरले आहे. येथे झालेल्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही घोषणा केली. सूर्यमंदिरासाठी प्रसिद्ध असलेले हे गाव आता 'सौरऊर्जा ग्राम' म्हणून ओळखले जाईल, असे ते म्हणाले. विधानसभा निवडणूक तोंडावर आली असताना पंतप्रधान तीन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर आहेत. यावेळी ते १४ हजार कोटींच्या प्रकल्पांचे उद्घाटन करणार आहेत. याअंतर्गत रविवारी 'सौरऊर्जा ग्राम' असलेल्या मोधेरामध्ये त्यांची सभा झाली. मोधेराने परकीय आक्रमणांमुळे आतापर्यंत अनेक अनन्वित अत्याचार सहन केले. मात्र आता आपली सांस्कृतिक ओळख कायम ठेवत आधुनिकतेची कास धरून गावाचा विकास होत आहे,' असे पंतप्रधान म्हणाले.

## गंभीर हृदयदोषाने ग्रासलेल्या नवजात बालकावर शस्त्रक्रिया

**पुणे :** जन्मत:च फुप्फुसाची झडप नसलेल्या एका नवजात बाळावर पीडीए स्टेंट टाकण्याची दुर्मीळ हृदय शस्त्रक्रिया आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ कार्डिओ थोरॅसिक सायन्सेस (एआयसीटीएस) मध्ये यशस्वी करण्यात आली. या बाळाला असलेल्या विकाराला वैद्यकीय परिभाषेत 'पल्मनरी एट्रेशिया' असे म्हणतात. स्टेंट टाकण्याची प्रक्रिया यशस्वी झाल्यामुळे या बाळाला नवजीवन मिळाले आहे.

## जिनपिंग यांची फेरनिवड जवळपास निश्चित?

**बीजिंग :** चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांनी रविवारी सत्ताधारी कम्युनिस्ट पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांशी संवाद साधला. गेल्या १० वर्षांत आपण केलेल्या कामांचा कार्य अहवाल देताना भविष्यातील योजनांचीही त्यांनी चर्चा केली. पुढल्या आठवड्यात पक्षाचे पंचवार्षिक अधिवेशन असून त्यावेळी जिनपिंग यांची अध्यक्षपदी सलग तिसऱ्यांदा निवड होणे जवळपास निश्चित झाल्याचे मानले जात आहे.

## इराणमध्ये हिजाब विरोधात निदर्शने सुरूच

**सुलेमानिया :** इराणमध्ये शनिवारी अनेक ठिकाणी सरकारविरोधी निदर्शने झाली. यात दोन जण मृत्युमुखी पडले. या सरकारविरोधी निदर्शनांचा हा चौथा आठवडा आहे. हिजाब न घातल्याने अटक केलेल्या २२ वर्षीय महसा अमिनी या तरुणीचा पोलीस कोठडीत मृत्यू झाल्यानंतर इराणमध्ये हिजाबविरोधी तीव्र निदर्शने सुरू आहेत. देशातील अनिवार्य इस्लामिक वेशभूषेच्या नियमांचे उल्लंघन केल्याच्या आरोपाखाली पोलिसांनी अमिनीला ताब्यात घेतले होते.

## लातूर जिल्ह्यात पुन्हा भूकंपाचे सौम्य धक्के

**लातूर :** लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील हासोरी परिसरात रविवारी दिवसभरात दोन वेळा भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले असल्याची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी साकेब उस्मानी यांनी दिली. रविवारी पहाटे एक वाजून २७ मिनिटाला भूकंपाचा सौम्य धक्का जाणवला त्याची तीव्रता २.१ रिश्टर स्केल इतकी होती तर रात्री नऊ वाजून ५७ मिनिटांनी बसलेल्या भूकंपाची तीव्रता १.९ रिश्टर स्केल इतकी होती. भूकंपाचा केंद्रबिंदू निलंगा तालुक्यातील हासोरी परिसरात आहे त्या परिसरातील सुमारे दहा एक गावांमध्ये भूकंपाचा सौम्य धक्का जाणवल्याचे नागरिकांनी सांगितले.

# तीन अर्थशास्त्रज्ञांना नोबेल पारितोषिक

## बँका-आर्थिक संकटावरील संशोधनासाठी सन्मान

**१० डिसेंबरला नोबेल पुरस्काराचे वितरण**

सुराज्य/स्टॉकहोम

**नोबेल समितीने सोमवारी अर्थशास्त्र क्षेत्रातील नोबेल पुरस्काराची घोषणाही केली. त्याअंतर्गत बेन एस बर्नान्के, डग्लस डब्ल्यू डायमंड आणि फिलिप एच डायबविग यांच्या नावांची घोषणा करण्यात आली. या तिन्ही अर्थतज्ज्ञांची या पुरस्कारासाठी संयुक्तपणे निवड करण्यात आली आहे. या तिघांना अर्थशास्त्र क्षेत्रातील 'बँकांवर संशोधन, आर्थिक संकट' यासाठी जगातील सर्वात प्रतिष्ठेचा**



**पुरस्कार जाहीर झाला आहे.**

समितीने नमूद केले की, तीन पुरस्कार विजेत्यांनी अर्थव्यवस्थेतील बँकांच्या भूमिकेबद्दल, विशेषत: आर्थिक संकटाच्या काळात आमची समज लक्षणीयरीत्या सुधारली आहे. त्यांनी केलेल्या संशोधनातील एक महत्त्वाची माहिती म्हणजे बँकांची पडझड टाळणे का महत्त्वाचे आहे. स्टॉकहोममधील रॉयल स्वीडिश ॲकॅडमी ऑफ सायन्सेसच्या नोबेल समितीने सोमवारी बेन एस. बर्नांक, डग्लस डब्ल्यू. डायमंड आणि फिलिप एच. डायबविग यांना अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्कार जाहीर केला.

या पुरस्कारांतर्गत १० दशलक्ष स्वीडिश क्रोनर (सुमारे नऊ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स) रोख पारितोषिक दिले जाते. हे पुरस्कार १० डिसेंबर रोजी प्रदान करण्यात येणार आहे.

## मोसमी पाऊस बदलाच्या दिशेने

**सुराज्य/मुंबई :** हवामान बदलाच्या परिणामामुळे गेल्या चार ते पाच वर्षांत पावसाचे स्वरूप हळूहळू बदलत आहे. यंदा तर, त्याचे नवीन रूप दिसून आले. मोसमी पाऊस प्रणाली तिच्या नेहमीच्या मार्गाचा अवलंब करत नसून त्याचा बदललेला परिणाम दिसून येत आहे. त्यामुळे येत्या काही वर्षांतही त्याचे रूप हे या वर्षीप्रमाणे असेल, अशी शक्यता आहे, असे 'क्लायमेट ट्रेंड'च्या अहवालात स्पष्ट केले आहे.

## आयोगाच्या विरोधात ठाकरे न्यायालयात

सुराज्य/मुंबई

निवडणूक आयोगाने शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे पक्षचिन्ह दोन्ही गोठवले. यानंतर आता शिवसेनेच्या ठाकरे गटाने या निर्णयाविरोधात दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेत आयोगाने नैसर्गिक न्यायाचं तत्व पाळले नाही आणि आम्हांला आमचे म्हणणे मांडण्याची संधी न देताच घाईत निर्णय दिला असे सांगण्यात आले आहे. शिवसेना नेते अनिल देसाई यांनी याबाबत माहिती दिली. ते सोमवारी (१० ऑक्टोबर) दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलत होते.

यावेळी अनिल देसाई म्हणाले, 'शिवसेनेचे नाव आणि चिन्ह गोठवण्याच्या निर्णयाविरोधात आम्ही दिल्ली उच्च न्यायालयात दाखल केली आहे. या याचिकेत नैसर्गिक न्यायाच्या तत्वांचे पालन झाले नाही. केंद्रीय निवडणूक आयोग ही स्वायत्त संस्था आहे. त्यांनी शनिवारी पक्षाशी संबंधित सर्व गोष्टी मागवल्या. आम्ही शनिवारीच सर्व गोष्टी सादर केल्या. मात्र, आयोगाने आमचे म्हणणे ऐकून न घेता शनिवारी रात्रीच निर्णय दिला.

## मुलायम सिंह यादव यांचे निधन

सुराज्य/उत्तरप्रदेश

**उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि समाजवादी पार्टीचे (सपा) संस्थापक मुलायम सिंह यादव यांचं गुरुग्राममधील रुग्णालयात उपचारांदरम्यान निधन झाले आहे. ते ८२ वर्षांचे होते. गुरुग्राममधील मेदांता रुग्णालयामध्ये मागील काही दिवसांपासून त्यांच्यावर उपचार सुरु होते.**



मुलायम यांचा जन्म २९ नोव्हेंबर १९३९ साली उत्तर प्रदेशमधील इटावा येथे झाला. त्यांनी अगदी तरुण वयापासून राजकारणात सक्रीय सहभाग घेतला होता. मुलायम सिंह यादव यांनी तीन वेळा उत्तर प्रदेश राज्याचे मुख्यमंत्री पद भूषवलं आहे. तसेच १९९६ ते १९९८ दरम्यान ते केंद्र सरकारमध्ये संरक्षणमंत्रीही होते. १९९२ साली मुलायम सिंह यांनी समाजवादी पक्षाची स्थापना केली. ५ डिसेंबर १९८९ रोजी मुलायम यांनी पहिल्यांदा राज्याच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली होती. ते २४ जानेवारी १९९१ पर्यंत या पदावर कार्यकरत होते. नंतर मायावती राज्याच्या मुख्यमंत्री झाल्या. १९९२ साली समाजवादी पक्षाची स्थापना केल्यानंतर वर्षभरात म्हणजेच ५ डिसेंबर १९९३ रोजी मुलायम सिंह दुसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदावर विराजमान झाले.

उत्तर प्रदेशच्या राजकारणावर आपली छाप पाडणाऱ्या मुलायम सिंह यादव यांनी केंद्रामध्येही संरक्षण मंत्रीपदासारखी महत्त्वाची भूमिका पार पाडली. एच. डी. देवेगौडा आणि त्यानंतर इंद्रकुमार गुजराल पंतप्रधान असताना मुलायम सिंह यादव हे संरक्षण मंत्री होते. १ जून १९९६ ते १९ मार्च १९९८ दरम्यान त्यांनी या पदाची जबाबदारी पार पाडली. त्यानंतर हे पद जॉर्ज फर्नाण्डिस यांनी सांभाळले.

# हल्ला करणाऱ्यांचे हात व बोटे कापा

## विश्व हिंदू सभेच्या रॅलीत प्रक्षोभक भाषण

सुराज्य/नवी दिल्ली

**दिल्लीत काही दिवसांपूर्वी मनीष नावाच्या तरुणाची हत्या करण्यात आली होती. मुस्लीम तरुणांनी त्याची हत्या केल्याचा आरोप आहे. पोलिसांनी या आरोपींना अटक केली आहे. मात्र, या हत्येच्याविरोधात विश्व हिंदू परिषदने दिल्लीतील रामलीला मैदानात एका रॅलीचे आयोजन केले होते. यावेळी उपस्थित असलेल्या योगेश्वर आचार्य, महंत नवल किशोर दास यांनी प्रक्षोभक भाषणे केली आहेत. भाषणादरम्यान काही वक्त्यांनी 'चुन चुन के मारेंगे'ची धमकी दिली. तर, एका वक्त्याने बंदुका घेण्याचे आवाहन उपस्थित समुदायाला केले आहे.**

योगेश्वर आचार्य यांनी म्हटले की, 'हे आपल्याला एक-एक करुन निशाणा साधत आहेत. त्यामुळे आपल्यावर हल्ला करणाऱ्यांचे बोट नाहीतर, थेट हात कापा. गरज पडल्यास त्यांचा शिरच्छेदही करा. याने जास्तीत जास्त कारागृहात जावे लागेल.



मात्र, यांना आता धडा शिकवण्याची वेळ आली आहे. चुन चुन के मारेंगे (ओळख पटवून मारु), अशी धमकी योगेश्वर आचार्य यांनी दिली.'

दुसरे वक्ते महंत नवल किशोर दास यांनी लोकांना बंदुका घेण्यास उकसवले आहे. परवाने मिळवून बंदुका घ्या. जर, तुम्हांला परवाने मिळाले नाहीतर काळजी करू नका. जे तुम्हांला मारायला येणार आहेत, त्यांच्याकडे परवाने आहेत का? मग तुम्हांला परवान्याची गरज कशाला? असे उपस्थित समुदायाला महंत नवल किशोर दास यांनी म्हटले. दरम्यान, मनीष या २५ वर्षीय तरुणाची मुस्लीम समाजाच्या तरुणांनी हत्या केली होती. मात्र, पोलिसांनी या हत्येमागे जातीय कारण नसल्याचे स्पष्ट केले आहे.

# तलावात पडून आईसह तीन मुलींचा दुर्दैवी मृत्यू

सुराज्य/सांगली

जत तालुक्यातील बिळुर येथे तलावात पडून आई आणि तीन मुलींचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. घराशेजारी असलेल्या तलावावर धुण्याचे कपडे आणि साबण असे साहित्य आढळून आले आहे. रात्री उशिरा तलावातून चारही मृतदेह बाहेर काढण्यात आले असून ते मृतदेह तपासणीसाठी रुग्णालयात आणण्यात आले आहेत.

मृत्यू झालेल्यांची नावे सुनीता माळी (वय ३०), अमृता माळी (वय वर्षे १३), अश्विनी माळी (वय वर्षे १०), ऐश्वर्या माळी (वय वर्षे ७) अशी आहेत. या प्रकरणाचा अधिक तपास जत पोलीस करत आहेत.



# धनुष्यबाण गोठल्याने 'खान की बाण' प्रचार मुद्दाही रंग बदलणार

## औरंगाबाद, उस्मानाबाद, परभणी जिल्ह्यात संभाव्य परिणामांवर शिवसैनिकांमध्ये चर्चा

सुराज्य/मुंबई

**शिवसेना नावासह धनुष्यबाण हे चिन्ह गोठवल्याने 'खान की बाण' या प्रचारतंत्राला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. हे घोषवाक्य जरी वापरले गेले नाही, तरी प्रचाराचा रंग शिवसेनेला कायम ठेवता येतो का, याविषयीही शंका घेतल्या जात आहेत. औरंगाबाद, परभणी व उस्मानाबाद जिल्ह्यात याचे परिणाम जाणवतील, असे सांगण्यात येत आहे. मात्र, शिवसेनेचे नेते ही बाब नाकारतात.**

सैन्यातील देशभक्त औरंगजेब आमचा आणि औरंगाबादच्या नावातील आलमगीर औरंगजेब नाकारण्याच्या नव्या वैचारिक पटलावर 'खान कि बाण' या सूत्राच्या पुनर्रचनेची उत्सुकता वाढू लागली आहे.

'खान कि बाण' या प्रचारतंत्रातील एक महत्त्वाची कृती म्हणून शिवसेनेचे नेते औरंगाबाद शहरातील सिल्लेखाना परिसरात आवर्जून सभा घ्यायचे. जो हवा तो संदेश शहरभर जायचा. या सभेत 'हिरवा साप' वगैरे अशी विशेषणे लावली जायची. मग प्रचाराचे टोक अधिक धारदार व्हायचे. आता शिवसेना नावासह 'धनुष्यबाण' चिन्ह गोठवले गेल्याने



'खान की बाण' अशी प्रचाराची तोफ धडाडणार

कशी, असा पेच शिवसेना कार्यकर्त्यांसमोर आहे. मात्र, याचा काही एक परिणाम होणार नाही. नवे चिन्ह पोहोचविण्यासाठी फक्त काही सेकंद लागतील. लोक व्यक्ती आणि विचार पाहतील, असा दावा विधान परिषदेतील नेते अंबादास दानवे यांनी केला. उगवता सूर्य, मशाल आणि त्रिशूल यापैकी कोणतेही एक चिन्ह मिळाले, तरी त्याचाही तेवढाच परिणाम असेल. कारण केवळ चिन्हांवर निवडणूक लढली जात असती, तर भाजपच्या कमळाला कोठे विरोधच झाला नसता. पण मतदार नेतृत्वाचा विचार आणि व्यक्तीमधील चांगुलपणा ओळखते. त्यामुळे शिवसेनेला फारशी अडचण येणार नाही असा दावा केला जात आहे. मात्र, औरंगाबाद, परभणी, उस्मानाबाद या तीन जिल्ह्यांतील विधानसभा मतदारसंघावर निवडणूक चिन्ह गोठवल्याचे परिणाम दिसून येतील, असे मानले जात आहे. कारण या तिन्ही जिल्ह्यातील मतदारसंघांत 'खान कि बाण' या सूत्राभोवती बांधलेली आहे. मात्र, शिवसेनेतील नेत्यांना अद्यापि ते मान्य नाही. केवळ अंधेरी पोटनिवडणुकीपुरते चिन्ह गोठविले आहे. त्यामुळे त्याच्या दूरगामी परिणामांवर लगेच चर्चा करण्यात अर्थ नाही. असे ते सांगतात.

# पंढरपूर पुरवठा विभागातील गैरकारभाराची चौकशी करा; उपायुक्तांचे तहसीलदारांना आदेश

✔ सुराज्य/सोलापूर

**पंढरपूर पुरवठा विभागातील सावळा गोंधळप्रकरणी पुणे विभागाचे पुरवठा उपायुक्त डॉ.त्रिगुण कुलकर्णी यांनी तहसीलदार सुशील बेल्हेकर यांना चौकशीचे आदेश दिले आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून पंढरपूर पुरवठा विभागातील कारभार हा झिरो कर्मचाऱ्यांवर सुरू आहे. या बेकायदा कर्मचाऱ्यांकडून रेशन दुकानदार व शिधापत्रिकाधारकांना वेठीस धरले जात आहे. व्हीआयपींच्या नावाखाली होत असलेली वसुली व मंथली ही झिरो कर्मचाऱ्यांच्या फोन पे वरून करण्यात येत आहे. यासंदर्भातील वृत्त प्रसिध्द झाल्यानंतर संबधितांचे धाबे दणाणले आहेत.**

दरम्यान, रेशन दुकानदार संघटना आक्रमक झाली असून पंढरपूर पुरवठा विभागातील सावळ्या गोंधळाविरोधात जिल्हा पुरवठा अधिकारी वर्षा लांडगे यांची भेट घेऊन त्यांच्यासमोर पाढा वाचण्यात येणार आहे. तसेच विशेष पथक नियुक्त करून या गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी करण्यात येणार असल्याचे समजते.

गेल्या महिन्यात मंगळवेढा पुरवठा निरीक्षकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून कारवाई झालेली असतानाही पंढरपूर पुरवठा विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी बोध घेतला नाही.





सुराज्य

## पंढरपूरचा पुरवठा विभाग झिरो कर्मचाऱ्यांमुळे बदनाम

### दलाल आणि झिरो कर्मचाऱ्यांकडून नागरिकांची लूटमार

✔ सुराज्य/सोलापूर

सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून बदनाम झालेला पुरवठा विभाग उपायुक्तांमुळे कात टाकत आहे. नावीन्यपूर्ण विविध योजना राबवत पुरवठा विभागाला आणि रेशन दुकानदारांना नव्या प्रवाहात आणण्याचे काम उपायुक्त त्रिगुण कुलकर्णी करत असताना यांच्या मोहिमेला काळिमा फासण्याचे काम पंढरपुरातील पुरवठा विभागाकडून केले जात आहे. पंढरपूरचा पुरवठा विभाग हा दलाल आणि झिरो कर्मचाऱ्यांच्या विळख्यात अडकला आहे. या विभागाकडे जिल्हापुरवठा अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची मागणी सामान्य नागरिक आणि रेशन दुकानदारांकडून होत आहे.

रेशन दुकानदारांना आयएसओ मानांकन मिळवून देणे असो, धनिकांनी धान्य सोडा, योजनेची प्रभावी अंमलबजावणी असो अथवा सीएससी सेंटरच्या माध्यमातून सर्व सुविधा एका छताखाली देण्याचा उपक्रम असो या योजनांमुळे रेशन दुकाने आणि पुरवठा विभागाचा कायापालट झाला आहे. त्यामुळे हा विभाग चर्चेत आला आहे. पुणे विभागाचे उपायुक्त त्रिगुण कुलकर्णी यांच्या नावीन्यपूर्ण योजनांमुळे राज्यात पुणे विभाग आघाडीवर आहे. यामध्ये सोलापूर जिल्हापुरवठा अधिकारी वर्षा लांडगे आणि शहर अन्नधान्य वितरण अधिकारी सुमित शिंदे यांच्या कामामुळे सोलापूरच्या कामांचा डंका राज्यभर झाला आहे. या प्रभावी कामांची दखल राज्यशासनाने घेतली असताना या सर्व योजनेवर पाणी फिरवत उपायुक्त त्रिगुण कुलकर्णी यांच्या मोहिमेला काळिमा फासण्याचे काम सध्या पंढरपुरातील पुरवठा विभागाच्या माध्यमातून केले जात आहे.

पंढरपूर तहसीलदार कार्यालयाअंतर्गत असलेला पुरवठा विभागात मात्र वेगळेच चित्र पाहावयास मिळत आहे. या विभागाकडे वरिष्ठ पातळीवरून दुर्लक्ष झाल्याने या विभागात झिरो कर्मचाऱ्यांचा सुळसुळाट झाला आहे. या झिरो कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीबाबत कोणतेही अधिकृत आदेश नसताना या कर्मचाऱ्यांची नियुक्ती केल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. या झिरो कर्मचाऱ्यांकडून शासकीय कार्यालयातील शासकीय कुटुंब रजिस्टरमधील युनिट कमी-जास्त करणे, आधार सिडींग, दुबार, नवीन शिधापत्रिका तयार करून देणे, अशी प्रकरणे बिनधास्तपणे हाताळताना दिसतात. यासाठी नागरिकांना वेठीस धरत चिरीमिरीची मागणी केली जाते. नाही दिल्यास प्रकरणे प्रलंबित ठेवत नाहक त्रास दिला जातो. शासनांच्या आकृतिबंधानुसार एक पुरवठा निरीक्षक, एक पुरवठा निरीक्षण अधिकारी, पूरक कर्मचारी वर्ग असताना दोन महिला ऑपरेटर, तीन झिरो कर्मचारी अशा पाच व्यक्तींची नियमबाह्य नियुक्ती करत त्यांच्या हाती पुरवठा विभागाचा कारभार दिल्याचे चित्र पंढरपूर पुरवठा विभागात आहे.

पंढरपूर पुरवठा विभाग आधार सिडिंगबाबत मागे आहे. अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. या विभागाबाबत उदासीनता असताना झिरो कर्मचाऱ्यांमुळे हा विभाग पुन्हा बदनाम झाला आहे. यात कार्यालयातील शासकीय कागदपत्रे गहाळ अथवा गायब झाल्यास याला जबाबदार कोण? असा असा प्रश्न निर्माण झाला आहे.

पंढरपूर तहसीलदार सुशील बेल्हेकर हे कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यांना राष्ट्रीय समाजरत्न पुरस्कार मिळाला आहे. त्यांनी कार्यालयात रायगड भवन, पार्किंग व्यवस्था, वृक्षारोपण, केबिनची पुनर्रचना, टाकाऊ लाकडांचा कल्पकतेने केलेला वापर या चांगल्या कामांमुळे चर्चेत आहेत. त्यांच्या आधिपत्याखाली येणाऱ्या पुरवठा विभागातील कृत्यामुळे बदनामी होण्याची शक्यता आहे.

याबाबत पंढरपूर तहसीलदार सुशील बेल्हेकर यांना विचारणा केली असता रविवार सुट्टीचा दिवस आहे, सुट्टीच्या दिवशी शासकीय माहिती विचारण्याचा अधिकार आपल्यास नाही, असे सांगत माहिती देण्यास टाळाटाळ केली.

**राज्य शासनाच्या दिवाळी गिफ्ट पॅकेटमध्ये देखील हे झीरे कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून पंढरपूर शहरांमध्ये सावळा गोंधळ निर्माण होण्याची शक्यता आहे शासनाच्या उदात्त हेतूला हे झिरो कर्मचारी काळीमा फासण्याची शक्यता आहे त्यामुळे या झिरो कर्मचाऱ्यांचा यापूर्वीच बंदोबस्त करण्याची मागणी देखील होत आहे**

**पंढरपूर विभागात झिरो कर्मचारी माध्यमातून चाललेला मंथली वसुलीचा प्रकार हा धक्कादायक आहे या सर्व प्रकरणाची दखल घेतली असून तहसीलदारांना याबाबतचे चौकशी आदेश दिले आहेत चौकशीनंतर संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई केली जाईल**
**- त्रिगुण कुलकर्णी, उपायुक्त पुरवठा विभाग**

## अल्पवयीन मुलीला फुस लावून पळवले; एकावर गुन्हा

✔ **सोलापूर :** एका सोळा वर्षाच्या अल्पवयीन मुलीला तरुणाने फूस लावून पळवून नेल्याची घटना दि.९ ऑक्टोंबर रोजी सोलापुरात घडली.याप्रकरणी पीडित मुलीच्या आईने विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. संतोष राम कापुरे (वय-२०, रा.सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेल्या तरुणाचे नाव आहे.




पिडीत मुलीच्या आई बाहेर गेल्या होत्या. काही वेळानंतर त्यांना त्यांच्या आईचा फोन आला व त्यांची मुलगी घरात कोणास काही न सांगता निघून गेली आहे, असे सांगितले.त्यावेळी मुलीच्या आईने मुलीचा सर्वत्र शोध घेतला असता, ती कुठेही मिळून आली नाही. संतोष कापुरे यानेच अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक देशमुख हे करीत आहेत.

## रिक्षा चालकाला दगडाने केली मारहाण

✔ **सोलापूर :** घराजवळ सोडल्या नसल्याच्या कारणावरून प्रवाशाने रिक्षाचालकास दगडाने मारहाण करून जखमी केले. ही घटना दि.९ ऑक्टोंबर रोजी रात्री बारा वाजण्याच्या सुमारास सुमित्रा पार्क जवळ घडली.याप्रकरणी नागनाथ मलकण्णा व्हसुरे (वय-५७, रा.बालाजी मंदिराजवळ, रामवाडी) यांनी विजापूर नका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. मारुती विलास जाधव (रा.अक्षय सोसायटी जुळे सोलापूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. व्हसुरे हे रिक्षा भाडे करत असताना जाधव याने त्यांनार डी मार्ट येथे सोडण्यात सांगितल मारुती जाधव याने ठरल्याप्रमाणे भाडे न देता रिक्षा थांबून घराजवळ सोडले नसल्याच्या कारणावरून व्हसुरे यांना दगडाने मारून जखमी केले. तपास पोलीस नाईक कांबळे हे करीत आहेत.

## डिझेल ओतून महिलेचा आत्मदहनाचा प्रयत्न

✔ **सोलापूर :** बार्शी पोलिस ठाण्यात वारंवार तक्रारी देऊनही त्याची दखल पोलिसांनी न घेतल्याने एका महिलेने सोमवारी अंगावर डिझेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. मिनाक्षी मंगल काळे (रा. संभाजी नगर, बार्शी) असे त्या महिलेचे नाव आहे. पोलिसांनी वेळीच त्याठिकाणी धाव घेऊन त्या महिलेच्या हातातील इंधनाचा डबा काढून घेतला.तिच्याविरूध्द सदर बझार पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.पोलिस नाईक आनंद कंचे तपास करीत आहेत.

## वृद्धाचा मोबाईल पळवला

✔ **सोलापूर :** अज्ञात चोरट्याने एका वृद्धाचा सात हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेला आहे. ही घटना एसटी स्टँड परिसरातील बार्शी स्टॉप येथे घडली. याप्रकरणी बाळासाहेब अनंतराव देशपांडे (वय-६८,रा.नागणे प्लॉट, आदर्श नगर, साईबाबा मंदिर जवळ ता.बार्शी) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

## एक्सलंट रिटेलर्स मोंढे एंटरप्रायझेसचे उद्‌घाटन

✔ **सोलापूर :** रिटेल किराणा क्षेत्रात महाराष्ट्रात नावलौकिक कमावलेल्या एक्सलंट रिटेलर्सच्या सोलापूरातील एक्सलंट रिटेलर्स मोंढे एंटरप्रायजेसचे उद्घाटन सोमवारी अभिनेत्री डॉ. निशिगंधा वाड यांच्या प्रमुख उपस्थितीत थाटात झाले. स्वामी समर्थ सुत गिरणीचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे आणि सोलापूर जनता सहकारी बँकेचे संचालक आनंद कुलकर्णी यांच्या हस्ते शिवस्मारक सभागृहात हा उद्घाटनाचा दिमाखदार सोहळा झाला.

उद्‌घाटनप्रसंगी व्यासपीठावर एक्सलंट रिटेलर्सचे व्यवस्थापकीय संचालक सचिन पाटील, विष्णू मोंढे, मनीषा मोंढे, पवन मोंढे यांची प्रमुख उपस्थिती होती. अभिनेत्री डॉ. निशिगंधा वाड म्हणाल्या, एक्सलंट रिटेलर्स मोंढे एंटरप्रायजेसमध्ये रिटेल किराणा क्षेत्रातील व्यावसायिक सुपरमार्केट किराणा दुकानदार, मॉल्स व जनरल स्टोअर्स यांच्यासाठी सर्व प्रकारची दर्जेदार उत्पादने एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्यामुळे दुकानदारांना पर्यायाने ग्राहकांना मोठा फायदा होणार आहे.

मोंढे यांनी आजवर विविध क्षेत्रात केलेल्या विश्वासार्ह उद्योग-व्यवसायामुळेच त्यांची या क्षेत्रात चांगली पत निर्माण झाली आहे. विश्वासामुळेच उद्योजक आणि उद्योजकता यशस्वी होते. एक्सलंट रिटेलर्स मोंढे एंटरप्रायजेसमुळे अधिकाधिक लोकांना फायदा होईल असा विश्वासही अभिनेत्री डॉ. वाड यांनी यावेळी व्यक्त केला. स्वामी समर्थ सुत गिरणीचे अध्यक्ष शिवदारे म्हणाले, मोंढे यांनी सोलापूरच्या सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही मोठे काम केले आहे. रिटेल सुपर स्टॉकिस्ट म्हणूनही ते उत्तम कामगिरी बजावतील असा विश्वास आहे. यावेळी विष्णू मोंढे, एक्सलंट रिटेलर्सचे व्यवस्थापकीय संचालक सचिन पाटील, मनीषा मोंढे, प्राचार्य मोहन देशपांडे यांनीही मनोगत व्यक्त केले.

आंतरराज्य सहकाररत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल यावेळी स्वामी समर्थ सूतगिरणींचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे यांचा मोंढे परिवाराकडून सत्कार करण्यात आला. तसेच संतोष डोंगरे, बसवराज करपे, दत्तू सगर या वितरकांचा व्यवसाय प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी प्रणव मोंढे आणि भार्गव मोंढे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. विष्णू मोंढे यांनी प्रास्ताविक केले. धनश्री केळकर यांनी सूत्रसंचालन केले. पवन मोंढे यांनी आभार मानले.




### डॉ. निशिगंधा वाड यांचा वाढदिवस साजरा

अभिनेत्री डॉ. निशिगंधा वाड आणि सोलापूर जनता सहकारी बँकेचे संचालक आनंद कुलकर्णी यांचा मंगळवारी वाढदिवस आहे. त्यानिमित्त सोलापूरकरांच्यावतीने केक कापून त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

## उड्डाणपुलाच्या अधिसूचनेसाठी मनपा आयुक्त घेणार बैठक

✔ **सोलापूर :** शहरातील दोन उड्डाणपुलाच्या नुकसानीची अधिसूचना जाहीर करण्यासंदर्भातील प्रक्रियेसाठी महापालिका आणि संबंधित विभागाची आढावा बैठक मंगळवारी आयोजित केल्याची माहिती महापालिका आयुक्त शिवशंकर यांनी दिली.

जुना पुना नाका ते पत्रकार भवन चौक (फेज १), जुना बोरामणी नाका ते मोरस्का बंगला (फेज २) असे दोन उड्डाणपूल होणार आहेत.



फेज १ मधील बाधीत मिळकतींची मोजणी, मिळकतींच्या मालकांची माहिती, इमारतींचे मुल्यांकनासाठी महापालिका, नगर भूमापन, भूमीअभिलेख, सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. फेज २ चे काम जून महिन्यात सुरू झाले. या कामात भूमी अभिलेख कार्यालयाकडून मालकांची अपुरी माहिती मिळाल्याचा दावा भूसंपादन अधिकारी केशव जोशी यांनी केला आहे. महापालिका आणि भूमी अभिलेख कार्यालयाने तत्काळ माहिती दिली. तरीही हे काम रखडले. आयुक्त पी. शिवशंकर यांनी सप्टेंबर महिन्यात आढावा बैठक घेतली. या बैठकीत भूसंपादन अधिकाऱ्यांनी सर्व तयारी पूर्ण झाली आहे, लवकरच अधिसूचना जाहीर करू असे सांगितले. त्यानुसार आयुक्तांनी दिवाळीपूर्वी नुकसान भरपाई रक्कम बाधितांना मिळेल, असे जाहीर केले. मात्र आयुक्तांच्या या मनसुब्यांना भूसंपादन कार्यालयाने ब्रेक लावला. अजूनही काम अपूर्ण असल्याचे सांगितले.

**भूसंपादन कार्यालयाकडून केवळ तक्रारी: अधिकाऱ्यांचे म्हणणे**

भूसंपादन कार्यालयाला सर्व विभागांकडून पुरेशी माहिती मिळत आहे. मात्र भूसंपादन कार्यालयात पुरेसा कर्मचारी वर्ग नसतो. वेळेवर अहवाल तयार केले जात नाहीत. याचे खापर महापालिकेवर आणि इतर विभागांवर फोडले जाते, असे नगररचना कार्यालयातील काही अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर आयुक्त आढावा बैठक घेणार आहेत.

## ... तर चौकशी समितीवरच कारवाई करण्यास भाग पाडू : आ.यशवंत माने

✔ सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या टेंडरची चौकशी चार अधिकाऱ्यांच्या समितीकडून होत आहे. त्या चौकशी समितीने निपक्षपातीपणे न केल्यास त्यांच्यावरच कारवाई करण्यास भाग पाडू, असा इशारा राष्ट्रवादीचे आमदार यशवंत माने यांनी दिला आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांना भेटण्यासाठी ते जिल्हा परिषद कार्यालयात आले असता त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील जलजीवन मिशनच्या टेंडर प्रक्रियेत गोंधळ झाल्याची तक्रार आमदार सुभाष देशमुख, आमदार यशवंत माने, आमदार राम सातपुते यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत केली होती यानंतर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी कार्यकारी अभियंता दीपक कोळी यांना रजेवर पाठवले आणि या प्रकरणाची चौकशी जलसंपदा, पाटबंधारे, सार्वजनिक बांधकाम आणि लेखा अधिकारी या चौघांच्या समितीमार्फत पंधरा दिवसात करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे कार्यकारी अभियंता कोळी यांच्या अडचणीत चांगलीच वाढ झाली आहे. याच पार्श्वभूमीवर सोमवारी आमदार यशवंत माने हे जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी स्वामी यांना भेटण्यासाठी ते आले असता त्यांची भेट झाली नाही. शेवटी पत्रकारांशी बोलताना ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या टेंडरची चौकशी चालू आहे, आम्ही पंधरा दिवस थांबणार आहोत या प्रकरणाची सखोल आणि निपक्षपातीपणे चौकशी न झाल्यास अधिकाऱ्यांवरच कारवाई करण्यास भाग पाडू असा इशारा त्यांनी दिला आहे.



## सहकार महर्षी कारखान्याचा गळीत हंगाम शुभारंभ

✔ **अकलूज :** शंकरनगर अकलूज येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखान्याच्या ६१ व्या ऊस गळीत हंगामाचा शुभारंभ कारखान्याची मार्गदर्शक संचालक माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या शुभहस्ते क्रेन चे बटन दाबून ऊस गव्हाणे टाकण्यात आला.

प्रारंभी त्यांच्याच हस्ते काटा पूजन व ऊस बैलगाडीचे पूजन यावेळी करण्यात आले यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील शिवामृत दूध उत्पादक संघाचे चेअरमन धैर्यशील मोहिते-पाटील, अर्जुनसिंह मोहिते-पाटील कारखान्याचे व्हॉइस चेअरमन प्रकाशराव पाटील, संचालक मंडळाचे सर्व- आजी माजी सदस्य परिसरातील सहकारी संस्थांचे पदाधिकारी कारखान्याचे पदाधिकारी सभासद कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले यांनी सर्वांचे स्वागत करून कारखाना परिस्थितीचा आढावा घेतला तर व्हॉइस चेअरमन प्रकाशराव पाटील यांनी यावर्षी १४ लाख टन ऊस गाळप उद्दिष्ट ठेवले असल्याचे सांगितले सभासदांनी आपला ऊस कारखान्यात देऊन सहकार्य करावे असे आव्हान केले संचालक महादेव घाडगे यांनी आभार मानले.

## समाजामध्ये तेढ निर्माण करणाऱ्याचा शोध घ्यावा : रियाज खरादी

✔ **सोलापूर :** आमदार विजयकुमार देशमुख यांना आलेल्या धमकीच्या पत्राची सखोल चौकशी करावी त्याच्यावर कारवाई करावी तसेच दोन समाजामध्ये तेढ निर्माण करणाऱ्याचाही शोध घ्यावा, अशी मागणी माजी नगरसेवक रियाज खरादी यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

आ.विजयकुमार देशमुख यांना दोन दिवसांपूर्वी पीएफआय च्या कार्यकर्त्यांकडून धमकी आल्याची बातमी आहे. पोलिसांनी त्याची सखोल चौकशी करावी आणि संबंधिताला अटक करावी तसेच या प्रकरणात हिंदू आणि मुस्लिम या समाजात तेढ निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे तात्काळ तात्काळ अशा प्रवृत्तीला अटक करावी. शहरात सर्व लोक सर्वधर्मसमभावाने राहतात. गेल्याच महिन्यात गणेशोत्सव आणि नवरात्र उत्सव सण दोन्ही समाजाने मिळून एकत्र साजरा केले. तसेच आज ईद-ए-मिलादही साजरी होत आहे. यामध्ये हिंदू बांधवही सहभागी झाले आहेत. अशी परिस्थिती असताना विनाकारण तेढ निर्माण केली जात आहेत. विनाकारण द्वेष निर्माण करण्याचा हा प्रकार आहे. या प्रकरणाचा तातडीने शोध घ्यावा आणि संबंधिताला अटक करावी, असे खरादी यांनी म्हटले आहे.



**कार्यकर्त्यांनी पोलिस तपासावर विश्वास ठेवावा**

आ. देशमुख यांना धमकी दिल्याप्रकरणी पोलिस आरोपीचा शोध घेत आहेत. ती व्यक्ती सोलापुरात नाही, असे तपासात कळल्याची माहिती आहे. भाजपाने आंदोलन करून स्टंटबाजी करू नये. पोलिस तपासावर विश्वास ठेवावा, असे रियाज खरादी यांनी म्हटले आहे.

## दिव्यांग कल्याणासाठीचा राखीव अखर्चित निधी पुढील वर्षी खर्च करा

### महापालिकेला राज्य शासनाचे परिपत्रकांन्वये आदेश!

✔ सुराज्य/सोलापूर

राज्याच्या नगर विकास विभागांतर्गत महापालिका, नगरपालिका या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा दिव्यांग कल्याणसाठी राखीव असलेला ५ टक्के निधी त्या वित्तीय वर्षात खर्च न झाल्यास, तो अखर्चित निधी पुढील वर्षात फक्त दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठीच खर्च करण्यात यावा. त्याची जबाबदारी संबंधित महापालिकामधील नोडल अधिकारी तसेच लेखा व वित्त अधिकाऱ्यांची राहील असे आदेश राज्य नगर विकास विभागाने परिपत्रकांद्वारे काढले आहेत. यामुळे दिव्यांगाना मोठा दिलासा मिळाला आहे.



या संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने शासन परिपत्रक दिनांक ३० सप्टेंबर २०२२ रोजी अवर सचिव यांच्या नावे काढले आहे. नि:समर्थ (अपंग) व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ केंद्र शासनाने प्रसिद्ध केलेला आहे.

या कायद्यातील कलम ३७ नुसार राज्यातील महापालिका, नगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तिसाठी ५ टक्के निधी राखीव ठेवून तो दिव्यांगांच्या व्यक्तिगत तसेच सामूहिक योजनांवर खर्च करण्यासंदर्भात शासन निर्णय निगर्मित केला आहे. नगर विकास विभागांतर्गत महापालिका, नगरपालिकेचा दिव्यांग व्यक्तिंच्या कल्याणार्थ राखीव ५ टक्के निधीमधील अखर्चित निधी त्या पुढील वर्षी खर्च करण्याबाबत मार्गदर्शक सूचना नसल्याने हा निधी दिव्यांकल्याणाकरिता खर्च करण्याबाबत अडचणी येत होत्या. महाराष्ट्र राज्य दिव्यांग कल्याण आयुक्त, पुणे यांच्या प्रस्तावानुसार दिव्यांगासाठी राखीव ५ टक्के अखर्चित निधी दिव्यांगांच्या योजनांसाठी पुढील आर्थिक वर्षात खर्च करण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती.

अखेर यासंदर्भात शासनाने परिपत्रक काढले आहे. नगर विकास विभागाचे अवर सचिव प्रतिभा पाटील यांच्या डिजिटल स्वाक्षरींने हे शासन परिपत्रक काढण्यात आले आहे.

**अखर्चित निधीतून बोनस द्यावा : फनीबंद**

अखर्चित निधी यापूर्वी शासनाकडे परत जात होता. मात्र या नव्या शासन परिपत्रकामुळे तो निधी आता परत जाणार नाही. यामुळे मोठा दिलासा दिव्यांग बांधवांना मिळाला आहे. महापालिका प्रशासनाने दिव्यांगासाठीच्या राखीव ५ टक्के निधीतून मागील वर्षीच्या अखर्चित शिल्लक निधी असल्यास त्या निधी मधून दिव्यांग बांधवांना या दिवाळीत बोनस ( सानूग्रह अनुदान) म्हणून द्यावा. ज्यामुळे शहरातील दिव्यांग बांधवांना दिवाळीनिमित्ताने मोठा आधार आणि दिलासा मिळू शकेल, अशी मागणी दिव्यांग संघटनेचे बाबूलाल फनीबंद यांनी केली आहे.

## आ.रणजितसिंह मोहिते-पाटलांकडून नुकसानग्रस्त भागाची पाहणी

✔ सुराज्य/कुर्डूवाडी

कुर्डूवाडी परिसरात झालेल्या अतिवृष्टीमुळे कुर्डू व पंढरपुर रोड लगतच्या लोकवस्तींमध्ये पाणी शिरल्यामुळे अनेकांचे संसार पाण्याखाली गेले. याची पाहणी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी केली मदतीसाठी शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. आ. मोहिते पाटील यांनी विविध या ठिकाणचे त्वरीत पंचनामे करुन जास्तीत जास्त प्रमाणात मदत करण्याच्या सूचना तहसीलदार राजेश चव्हाण तात्काळ फोनवरुन दिल्या.



पुराच्या पाण्यामुळे एस.टी. आगारातील देखिल नुकसान झाले आहे. त्या संदर्भात देखिल वरिष्ठ अधिकार्यांशी बोलून निधी देण्याचे आश्वासन दिले. यावेळी माजी आमदार नारायण पाटील, शिवाजीनाना कांबळे, भारत पाटील, सुहास शहा, शंकर बागल, प्रविण सोमासे, तात्या गोडगे, उमेश पाटील, कुर्डूवाडी सर्कलचे तलाठी प्रविण बोटे, कुर्डू सर्कलचे तलाठी मेहर, विक्रम बोरकर, सुधीर गाडेकर, अमोल कुलकर्णी, अतुल फरतडे, राजाभाऊ शेंबडे, बालाजी लुक्कड, प्रतिक्षाताई गोफणे, पद्मावती दातार, रेश्मा जाधव, निलेश सुराणा, बालाजी गायकवाड,विवेक दिक्षीत, सुनिल पारखे,हरिश घोणे, सुहास सरडे, सागर गोफणे, सागर बंदपट्टे, प्रदिप मराळ, रामा मोरकाणे, संतोष गवळी, स्वप्निल गोरे उपस्थित होते. यावेळी पाहणी करण्यासाठी आलेल्या मोहिते पाटलांना परिसरातील महिलांनी गराडा घालून समस्यांचा पाढा वाचला.